७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

बुधवार, दि. १५ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०० | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# काळा घोडा आर्ट एवेन्यू सुशोभीकरण कामांचे लोकार्पण

## कला, वारसा आणि आधुनिक सुविधांचा काळा घोडा परिसरात संगम – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई (दै. संध्या)**



मुंबईचे वैभव असलेल्या काळाघोडा परिसरातील रस्त्यांचे अत्यंत उत्तमरित्या सुशोभीकरण करण्यात आले आहे. सुशोभीकरण कामातून कलात्मक व तत्कालीन वास्तुकलेशी समरसता जपण्यात आली आहे. कला, वारसा आणि आधुनिक सुविधांच्या झालेल्या संगमातून या परिसराचे नवे रूप नागरिकांना अनुभवता येणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते काळा घोडा आर्ट एवेन्यू सौंदर्यीकरण कामांचे लोकार्पण काळा घोडा प्लाझा, बी. भरूचा मार्ग येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात आले. नागरिकांसाठी असलेली ही व्यवस्था 'हेरिटेज वॉक' आहे. येथील पाथ वे आणि प्रत्येक जागेला कलात्मक स्पर्श करण्यात आला आहे. अत्यंत सुंदर व्यवस्था आहे त्याच शिस्तीमध्ये सुरू राहावी, यासाठी येथे येणारे नागरिक, येथील व्यावसायिक यांनी दक्षता घ्यावी, अशी अपेक्षाही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

यावेळी व्यासपीठावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड आशिष शेलार, महापौर रितू तावडे, स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे, मनपा विरोधी पक्ष नेत्या किशोरी पेडणेकर, सभागृह नेते गणेश खणकर, नगरसेवक हर्षिता नार्वेकर, बृन्हमुंबई महानगर पालिका आयुक्त अश्विनी भिडे, बृन्हमुंबई महानगर पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त प्राजक्ता लवंगारे,आदी उपस्थित होते. दक्षिण मुंबईतील काळा घोडा परिसर युनेस्कोच्या 'व्हिक्टोरियन गॉथिक अँड आर्ट डेको आसम्बल ऑफ मुंबई' या जागतिक वारसा स्थळाला लागूनच असल्यामुळे मुंबईकरांना हेरिटेज वॉकचा आनंद घेता यावा, यासाठी पाच रस्त्यांचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. यामध्ये परिसरातील साईबाबा मार्ग, रोप वॉक लेन, डॉ. व्ही. बी. गांधी मार्ग, फोर्ब्स स्ट्रीट, रुदरफोर्ड स्ट्रीट व बी. भरुचा मार्ग या रस्त्यांचा समावेश आहे. येथे संग्रहालये, कला दालने व ऐतिहासिक वारसा असलेल्या इमारती आहेत. दरवर्षी भरविला जाणारा काळा घोडा कला महोत्सव या परिसराची सांस्कृतिक ओळख आहे.

बी. भरूचा मार्गावरील चौकात 'प्लाझा' साकारण्यात आला असून करडा आणि काळा ग्रॅनाईट तसेच बेसॉल्ट फरशीचा यासाठी वापर करण्यात आला आहे. या प्लाझाजवळ टेबल-खुर्चीवर बसून मुंबईकर, पर्यटक या परिसराचा, येथील स्वादिष्ट पदार्थांचा आनंद घेवू शकणार आहेत. आकर्षक स्ट्रीट आर्ट भित्तिचित्रे आणि सार्वजनिक बसण्याच्या खास जागा देऊन अधिक पादचारी-स्नेही मार्ग बनविण्यात आला आहे.

# तुकाराम मुंढेंचा धडाका कायम!

### तीन सुप्रसिद्ध हॉटेल्सवर कारवाई, अस्वच्छतेमुळे जागेवरच परवाना रद्द

**मुंबई (दै. संध्या)**



आपल्या कडक आणि शिस्तप्रिय कार्यपद्धतीसाठी ओळखले जाणारे अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईत मोठी कारवाई करण्यात आली आहे. मुंबईतील अत्यंत लोकप्रिय आणि नामांकित अशा तीन हॉटेल्सचे अन्न परवाने निलंबित करण्यात आले आहेत. भेंडीबाजार आणि उमरखाडी परिसरातील या हॉटेल्सवर ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे हॉटेल व्यावसायिक आणि खाद्यप्रेमींमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

एफडीएने केलेल्या या धडक कारवाईत मुंबईतील खालील तीन मोठ्या हॉटेल्सचे परवाने निलंबित करण्यात आले आहेत.

- शालिमार हॉस्पिटॅलिटी
- नूर मोहम्मदी हॉटेल
- रहमानिया रेस्टॉरंट

एफडीएच्या अधिकाऱ्यांनी या हॉटेल्सची अचानक तपासणी केली असता, तिथे स्वच्छता, अन्नसुरक्षा आणि परवाना नियमांचे गंभीर उल्लंघन होत असल्याचे उघडकीस आले. तपासणीदरम्यान खालील धक्कादायक बाबी निदर्शनास आल्या:

- हॉटेल्सच्या स्वयंपाकघरात प्रचंड अस्वच्छता आढळून आली, तसेच तिथे कीटकांचा वावर असल्याचेही स्पष्ट झाले.
- ग्राहकांना दिल्या जाणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेची कोणतीही तपासणी केली नसल्याचे समोर आले.
- हॉटेलमध्ये वापरल्या जाणाऱ्या कच्च्या मालाच्या खरेदीच्या नोंदी आणि वापरल्या जाणाऱ्या खाद्यतेलाच्या गुणवत्तेच्या नोंदी ठेवल्या गेल्या नव्हत्या.

या सर्व त्रुटींमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याचे स्पष्ट करत एफडीएने थेट निलंबनाची कारवाई केली.

# बंदी असूनही गुटखा मिळतो कसा?

### तुकाराम मुंढे यांचा मोठा खुलासा; दूध भेसळखोरांना जन्मठेपेचा इशारा

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यात गुटखा आणि भेसळयुक्त अन्नाचा सुळसुळाट रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आता पूर्णपणे ॲक्शन मोडमध्ये आले आहे. FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या विशेष मुलाखतीत गुटखा माफियांची नवी कार्यपद्धती आणि राज्यातील दूध भेसळीच्या धक्कादायक वास्तवावर प्रकाश टाकला. "स्वतःचे आयुष्य स्वतः खराब करू नका, विष विकत घेऊ नका," असे आवाहन करत त्यांनी माफिया आणि भेसळखोरांना कडक इशारा दिला आहे. दिलेल्या मुलाखतीत बोलताना मुंढे यांनी गुटखा बंदीची अंमलबजावणी, गुटखा माफियांचे जाळे, दूध भेसळ आणि अन्न सुरक्षेसंदर्भातील कायद्याची माहिती दिली. तुकाराम मुंढे म्हणाले की, महाराष्ट्रात गुटख्याचे उत्पादन, साठवणूक आणि विक्रीवर 2012 पासून बंदी आहे. मात्र, गुटखा माफियांनी आपली कार्यपद्धती बदलली असून त्यांनी उत्पादन केंद्रे राज्याबाहेर हलवली आहेत. त्यामुळे महाराष्ट्रात बंदी असली तरी शेजारच्या राज्यांतून गुटख्याची तस्करी केली जात असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी स्पष्ट केले की, गुटखा माफियांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई सुरू झाल्यानंतर या टोळ्यांनी आपले जाळे राज्याबाहेर विस्तारले. त्यामुळे पुरवठ्याचे स्रोत बदलले असले तरी बेकायदेशीर व्यापार सुरूच असल्याचे त्यांनी नमूद केले. गुटखा विक्रीप्रकरणी लहान टपऱ्यांवर कारवाई होताना दिसते, मात्र मोठ्या कंपन्यांवर कारवाई का होत नाही, असा प्रश्न अनेकदा उपस्थित केला जातो. यावर उत्तर देताना मुंढे म्हणाले की, संबंधित कंपन्या राज्याबाहेरून संपूर्ण साखळी चालवत आहेत. मात्र आता अशा कंपन्यांच्या मालकांनाही थेट गुन्ह्यात आरोपी केले जात असून त्यांच्याविरोधात प्रथम माहिती अहवाल नोंदवले जात आहेत. पूर्वी मोठ्या ट्रकद्वारे गुटख्याची वाहतूक केली जात होती. मात्र, तपास यंत्रणांना चकवा देण्यासाठी आता तस्कर चारचाकी वाहनांचा वापर करू लागल्याचे मुंढे यांनी सांगितले.

# ३० जुलैपूर्वी रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात : कृषीमंत्र्यांची घोषणा

### पावसाबाबतही दिले अपडेट, बोगस बियाणे प्रकरणात १८ कंपन्यांवर कारवाई



**मुंबई (दै. संध्या)**

राज्यातील बोगस सोयाबीन बियाणे प्रकरणात सरकारने कडक भूमिका घेतली असून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या 18 बियाणे कंपन्यांविरोधात कठोर कारवाई सुरू करण्यात आली आहे. कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी त्यांनी कर्जमाफी, पावसाची स्थिती, पिकांचे नुकसान आणि राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत चर्चांवरही भूमिका स्पष्ट केली.

भरणे म्हणाले की, राज्यातील अनेक शेतकऱ्यांनी पेरलेले सोयाबीन बियाणे उगवले नसल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे मोठ्या प्रमाणावर आल्या. त्यानंतर कृषी विभागाने तातडीने तपासणी मोहीम राबवली. सर्वाधिक तक्रारी अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, वाशिम, लातूर आणि धाराशिव या दहा जिल्ह्यांतून प्राप्त झाल्या.

कृषिमंत्र्यांनी सांगितले की, राज्यभरातून सोयाबीन बियाण्यांचे 5,638 नमुने तपासणीसाठी घेण्यात आले. त्यापैकी 581 नमुने अप्रमाणित आढळले. या प्रकरणात संबंधित कंपन्यांविरोधात 181 न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्यात येत आहेत. उगवण क्षमतेबाबत आलेल्या 3,615 तक्रारींपैकी 1,738 तक्रारींची तालुकास्तरीय समित्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन तपासणी केली आहे. एकूण 18 बियाणे कंपन्यांविरोधात मोठ्या प्रमाणावर तक्रारी आल्या असून दोषी कंपन्यांवर कठोर कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यापैकी बूस्टर प्लांट जेनेटिक्स लिमिटेड, रवी हायब्रिड, पार्श्व जेनेटिक्स, इनोव्हा सीड्स, ओसवाल सीड्स, केडीएम सीड्स, ग्रीन गोल्ड सीड्स, आदित्य सीड्स, अंकुर सीड्स, श्री सीड्स आदी कंपन्यांविरोधात तक्रारी नोंदविण्यात आल्या आहेत. बूस्टर प्लांट जेनेटिक्सविरोधात तीन तर रवी हायब्रिड सीड्सविरोधात एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या प्रकरणात कठोर कारवाईचे निर्देश दिले आहेत. ज्या ठिकाणी आवश्यक असेल तेथे शेतकऱ्यांना बियाणे बदलून देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. भविष्यात अशा प्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना कोणतीही सवलत दिली जाणार नाही.

कर्जमाफीबाबत बोलताना भरणे म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 30 जूनपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा केली होती. मात्र त्यानंतर पावसाळी अधिवेशन, पुरवणी मागण्या आणि राज्यपालांच्या मंजुरीची प्रक्रिया पूर्ण करावी लागली. आता ही प्रक्रिया पूर्ण झाली असून आयकर भरणाऱ्या शेतकऱ्यांची यादी केंद्र सरकारकडून मिळाल्यानंतर लाभार्थ्यांची अंतिम यादी निश्चित केली जाईल.

### राष्ट्रवादीतील मतभेदांच्या चर्चेवर प्रतिक्रिया

राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत मतभेदांच्या चर्चेवर बोलताना दत्ता भरणे म्हणाले की, पक्षासमोर कोणतेही आव्हान नाही. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली पक्ष भक्कम असून प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, छगन भुजबळ यांसारखे वरिष्ठ नेते पक्षात सक्रिय आहेत. काहीजण प्रसिद्धीसाठी अशा प्रकारची विधाने करत असतात, त्याला आम्ही कोणतेही महत्त्व देत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

### ढिंग-टांग




## निवृत्ती वेतनही मिळणार, मुलांच्या शिक्षणासाठी ६० हजार

# बांधकाम कामगारांना सुधारित कल्याणकारी योजना लागू

**मुंबई (दै. संध्या)**



राज्य शासनाच्या इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्यावतीने राज्यातील लाखो नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. कामगारांचे आर्थिक उत्पन्न वाढवणे, त्यांच्या सामाजिक सुरक्षेला प्राधान्य देणे आणि त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे या उद्देशाने मंडळाच्या 4 प्रमुख कल्याणकारी योजनांमध्ये सामाजिक सुरक्षा संहिता 2020 नुसार महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या आहेत. सुधारित तरतुदींनुसार कामगारांना मिळणाऱ्या लाभ रकमेत वाढ करण्यात आली आहे, अशी माहिती कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी दिली आहे.

नोंदणीकृत बांधकाम कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाला, तर त्याच्या कुटुंबाला आधार म्हणून दिली जाणारी एकवेळची आर्थिक मदतीची रक्कम आता 3 लाख 50 हजार रुपये करण्यात आली आहे. कामगाराचा अपघाती दुर्दैवी मृत्यू झाल्यास, त्याच्या कुटुंबाची आर्थिक वाताहत रोखण्यासाठी अपघाती मृत्यू सहाय्य म्हणून एकवेळ तब्बल 6 लाख 50 हजार रुपयांचे भरीव आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. याशिवाय, जर एखाद्या कामगाराला अपघातामुळे किंवा अन्य कारणांमुळे कायमचे अपंगत्व आल्यास एकवेळचे दिव्यांग सहाय्य म्हणून 2 लाख रुपयांची मदत दिली जाणार आहे.

बांधकाम कामगारांच्या वृद्धत्वाचा काळ सुकर व्हावा, यासाठी मंडळाकडे नोंदणीकृत कामगारांकरिता निवृत्तीवेतन योजनेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. वयाची 60 वर्षे पूर्ण केलेल्या व मंडळाकडे सलग किमान 10 वर्षे पूर्ण नोंदीत असलेल्या बांधकाम कामगारांना निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ कामगारांच्या मंडळाकडील एकूण नोंदणी कालावधीशी जोडण्यात आला आहे. त्यानुसार, ज्या कामगारांचा नोंदणी कालावधी झाला आहे, त्यांना 50 टक्क्यांच्या मर्यादेत म्हणजेच प्रतिवर्ष 6 हजार रुपये निवृत्तीवेतन दिले जाईल. ज्या कामगारांची नोंदणी एकूण 15 वर्षे पूर्ण झाली आहे, त्यांना 75 टक्क्यांच्या मर्यादेत म्हणजेच प्रतिवर्ष 9 हजार रुपये मिळतील, तर ज्या कामगारांचा नोंदणी कालावधी एकूण 20 वर्षे पूर्ण झाला आहे, अशा कामगारांना प्रतिवर्ष पूर्ण 12 हजार रुपये निवृत्तीवेतन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे.

कामगारांच्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आणि त्यांना उच्च शिक्षणाची दारे खुली करून देण्यासाठी शैक्षणिक सहाय्य योजनेची पुनर्रचना करण्यात आली आहे. हे शैक्षणिक अर्थसहाय्य बांधकाम कामगाराच्या पहिल्या दोन पाल्यांकरिता मर्यादित असेल. प्राथमिक आणि माध्यमिक स्तरावर इयत्ता 9 वी उत्तीर्ण पाल्यास प्रति पाल्य 20 हजार रुपये आणि इयत्ता 11 वी उत्तीर्ण झालेल्या पाल्यास पुढील शिक्षणासाठी 25 हजार रुपये इतके अर्थसहाय्य दिले जाईल.

उच्च शिक्षणामध्ये वैद्यकीय पदवीचे शिक्षण घेणाऱ्या कामगारांच्या पाल्यास प्रति पाल्य 1 लाख रुपये आणि अभियांत्रिकी पदवीचे शिक्षण घेणाऱ्या पाल्यास प्रति पाल्य 60 हजार रुपये अर्थसहाय्य मंजूर करण्यात येणार आहे. सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष तरतूद करण्यात आली असून, केंद्रीय संरक्षण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पाल्यांच्या दरवर्षीच्या पूर्ण अभ्यासक्रम शुल्काची प्रतिपूर्ती शासन करेल. तसेच इतर शासन मान्यताप्राप्त अनुदानित व विना-अनुदानित सैनिक शाळांमध्ये शिकणाऱ्या पाल्यांना प्रतिवर्ष 10 हजार रुपयांचे सहाय्य दिले जाईल.

या योजनेचा विस्तार आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्यात आला असून, जे पाल्य परदेशात जाऊन पदव्युत्तर पदवी किंवा पी.एच.डी. सारखे उच्च शिक्षण घेत आहेत, त्यांच्या अभ्यासक्रम शुल्काची संपूर्ण रक्कम शासन थेट संबंधित परदेशी विद्यापीठाकडे वर्ग करणार आहे.

# संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यातील अपघातामधील जखमींची प्रकृती स्थिर

### भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण व माजी आ. संजय जगताप यांनी केली जखमींची चौकशी



**जेजुरी (दै. संध्या)**

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सोमवार दिनांक 13 रोजी जेजुरी जवळील भोंगळे मळा येथे झालेल्या अपघातातील जखमींची प्रकृती स्थिर असून भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी आमदार संजय जगताप यांनी जेजुरी येथील आनंदी हॉस्पिटल मध्ये जाऊन जखमींच्या भेट घेऊन विचारपूस केली.

सोमवार दिनांक 13 रोजी सासवड हून जेजुरी कडे संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा मार्गस्थ झाला. सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास आळंदी पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्याच्या पुढे सुमारे दोनशे मीटर अंतरावर भोंगळे मळा दरम्यान सांगली जिल्ह्यातील दिंडीत ट्रक घुसून मोठा अपघात घडला. या अपघातात दिंडीतील तीन महिलांचा जागीच मृत्यू झाला तर इतर सहा महिला जखमी झाल्या. जेजुरी येथील आनंदी हॉस्पिटलमध्ये सहा महिलांवर उपचार सुरू असून दिनांक 13 रोजी,उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, तसेच आज सकाळी भाजपचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण,माजी आमदार संजय जगताप यांनी जखमींची भेट घेऊन विचारपूस केली.

# संपादकीय

## महिला सक्षमीकरण : समृद्ध समाजाचा भक्कम पाया

"यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता" असे आपल्या संस्कृतीत म्हटले जाते. स्त्रीचा सन्मान ज्या समाजात केला जातो, तो समाज प्रगतीच्या शिखरावर पोहोचतो. मात्र प्रत्यक्ष वास्तव पाहिले तर आजही अनेक महिलांना शिक्षण, रोजगार, आरोग्य, सुरक्षितता आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळत नाही. त्यामुळे महिला सक्षमीकरण ही केवळ एक घोषणा नसून, समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यावश्यक गरज आहे.

महिला सक्षमीकरण म्हणजे महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनविणे. स्वतःचे निर्णय घेण्याची क्षमता, स्वतःच्या अधिकारांची जाणीव आणि आत्मविश्वासाने जीवन जगण्याचे बळ मिळणे, हाच महिला सक्षमीकरणाचा खरा अर्थ आहे. जेव्हा महिला सक्षम होते, तेव्हा केवळ एक व्यक्ती नव्हे तर संपूर्ण कुटुंब आणि समाज सक्षम होतो. शिक्षण हे महिला सक्षमीकरणाचे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षित महिला आपल्या कुटुंबाला योग्य दिशा देते, मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देते आणि समाजात सकारात्मक बदल घडवून आणते. त्यामुळे प्रत्येक मुलीला दर्जेदार आणि सुरक्षित शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागात आजही अनेक मुली शिक्षणापासून वंचित राहतात. ही परिस्थिती बदलण्यासाठी शासनासोबत समाजानेही पुढाकार घेणे आवश्यक आहे.

आर्थिक स्वावलंबन हे महिला सक्षमीकरणाचा दुसरा महत्त्वाचा आधार आहे. रोजगार, उद्योग, स्वयंरोजगार, बचत गट आणि कौशल्य विकासाच्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याची संधी मिळाली पाहिजे. आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेली महिला आपल्या कुटुंबाच्या निर्णयप्रक्रियेत प्रभावी भूमिका बजावते आणि समाजात तिचा सन्मान वाढतो.

राजकारण, प्रशासन, विज्ञान, संरक्षण, न्यायव्यवस्था, उद्योग, क्रीडा, कला, साहित्य आणि उद्योजकता अशा प्रत्येक क्षेत्रात आज महिलांनी आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदांपासून ते अवकाश संशोधनापर्यंत महिलांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही यशोगाथा प्रेरणादायी असली तरी प्रत्येक महिलेला समान संधी मिळवून देण्यासाठी अजूनही मोठे प्रयत्न आवश्यक आहेत. महिलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न तितकाच गंभीर आहे. घर, कार्यस्थळ, सार्वजनिक ठिकाणे आणि डिजिटल माध्यमांवर महिलांना सुरक्षित वातावरण मिळाले तरच त्यांचा आत्मविश्वास वाढेल. महिलांवरील अत्याचार, छळ, भेदभाव आणि बालविवाह यांसारख्या सामाजिक विकृतींविरोधात कठोर कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी आणि समाजाची सकारात्मक मानसिकता आवश्यक आहे. महिला सक्षमीकरणासाठी शासनाने अनेक योजना राबवल्या आहेत. स्वयं सहाय्यता बचत गट, कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योजकतेसाठी कर्ज योजना, मुलींच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, मातृत्व लाभ आणि आरोग्यविषयक विविध उपक्रम यामुळे महिलांना नवी संधी मिळत आहे. मात्र या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. महिला सक्षमीकरण ही केवळ महिलांची जबाबदारी नाही. कुटुंब, समाज, शैक्षणिक संस्था, शासन आणि पुरुष वर्ग या सर्वांनी समानतेची भावना स्वीकारणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यातील भेदभाव संपवून समान संधी देण्याची सुरुवात घरापासूनच झाली पाहिजे. मुलींना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य, शिक्षणाची संधी आणि स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रोत्साहन मिळाले तर देशाच्या विकासाला नवी गती मिळेल. आज भारत विकसित राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत आहे. हे स्वप्न तेव्हाच साकार होईल, जेव्हा देशातील प्रत्येक महिला सुरक्षित, शिक्षित, स्वावलंबी आणि आत्मविश्वासपूर्ण असेल. महिला सक्षमीकरण हा सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे, विकासाचा पाया आहे आणि उज्ज्वल भविष्याचा मार्ग आहे. म्हणूनच प्रत्येकाने महिलांचा सन्मान, समानता आणि संधी यांचा पुरस्कार करून महिला सक्षमीकरणाची चळवळ अधिक व्यापक करण्याची गरज आहे.

## संस्कृत सुभाषित

भद्रं कृतं कृतं मौनं  
कोकिलैर्जलदागमे। दर्दुरा यत्र वक्तार :  
तत्र मौन हि शोभनम।।

अर्थ – पावसाळा सुरु झाल्यावर कोकिळा मौन धारण करतात हे चांगले. कारण बेडकांचे बरळणे सुरु झाल्यावर (तिचे)मौनच शोभून दिसते.

## गुरु वचन

### आनंदी राहण्याचा निर्णय घ्या – सुधांशु महाराज

आनंदी राहाणे ही एक चांगली सवय आहे. पण, लोक आनंदी राहाण्यापेक्षा दु:खाची कारणे शोधण्यातच वेळ घालवतात. आनंदी राहण्यामुळे सकारात्मक ऊर्जा प्रवाहित होऊन सुख आणि समृद्धी येते. म्हणून आनंदी राहण्याचा निर्णय घ्या.

प्रसन्नतेत सौंदर्य आहे. प्रसन्नता आनंदी राहण्यामुळे येते. त्यामुळे आनंदी राहा. वेळ, शक्ती, उर्जा व योग्यतेचा उपयोग केल्यास आपली प्रगती निश्चित आहे. प्रत्येकाने आधी स्वत:ला ओळखले पहिजे. जो स्वत:ला ओळखत नाही तो स्वत:चा शत्रू असतो, असे समजा. स्वत:ला ओळखणाऱ्याची प्रगती आणि विकास होतो. सुख, समृद्धी, यश त्याच्या दाराशी येते. या उलट आळशी, निष्काळजी, विकासापासून दूर पळणाऱ्या आणि आलेली संधी गमावणाऱ्याला कधीही सुख–शांती मिळत नाही.

विद्या, शौर्य, कौशल्य, शक्ती व धैर्य हे पाच गुण तुमचे मित्र आहे. नकारात्मक विचार आणि उदासीन दृष्टिकोनामुळे हे पाचही मित्र हरवतात. आणि तुम्ही आठवण केली तेव्हा तुमच्या मदतीला धावून येतात. पण, ते हरवल्यानंतर त्यांना शोधण्यासाठी बाहेर धाव न घेता स्वत:च्या अंतरंगात शोधा. कारण हरवलेली वस्तू हरवलेल्याच ठिकाणी सापडते हे लक्षात घ्या. दिवसाची सुरुवात नामस्मरण आणि नमस्काराने करा. कारण नमस्कार भगवंतालाही आवडतो. नेहमी हसतमुख राहा. त्यामुळे तुम्ही स्वत: तर आनंदी राहताच पण, तुमच्या संपर्कात येणाऱ्यालाही आनंद देता.

## उपदेशकथा

### वृथा अभिमान

एका गावातलं सरोवर पुष्कळ पाण्यानं भरलेलं असे. त्यातले मासे, कासव व इतर जलचर प्राणी सुखानं राहात. उन्हाळ्याची चाहूल लागली आणि त्यातलं पाणी हळूहळू आटू लागलं तेव्हा माशांनी नदीकडे जायचं ठरवलं. त्यातील एक कासव मात्र तिथचं राहिलं. त्याचे मित्र म्हणाले, 'उन्हाळ्यात सर्व पाणी आटून जाईल तेव्हा आताच आमच्याबरोबर चल कसा! कासव म्हणालं, 'माझी जन्मभूमी सोडून मी जाणार नाही. इथंच राहीन. मित्र त्याचं मन वळवू शकले नाहीत. त्याला सोडून सर्व मासे नदीकडे गेले. उन्हाळा आला. सर्व पाणी आटलं. सर्वत्र चिखल झाला. जन्मभूमी सोडून न जाण्याचा निश्चय करणारं कासव मात्र तिथंच चिखलात रुतून बसलं. कुणीतरी चिखल उकरू लागलं तसं कासवाचं कवच फुटलं आणि कासव वेदनेनं तळमळत राहिलं.

कथा उपदेश : काळाच्या पावलानुसार परिस्थिती ओळखायला हवी. तिथं वृथा अभिमान करता कामा नये.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:बव ११:५१:१६ |
| १५जुलै २०२६ | करण:बालव २२:१८:३९ |
| बुधवार | सूर्य:मिथुन |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:कर्क |
| आषाढ शके | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – मोहरम |
| संवत्सर –पराभवनाम | तारीख – २९ |
| अयन– दक्षिणयन | विशेष |
| मास– आषाढ | आषाढ मासारंभ |
| ऋतु– सौर वर्षा | श्री टेंबेस्वामी पुण्यतिथी |
| शुक्ल पक्ष | चंद्रदर्शन |
| तिथि:प्रतिपदा ११:५१:१६ | महाकवी कालिदास दनि |
| नक्षत्र:पुष्य २१:४६:२४ | भगवंत महाराज |
| योग:हर्षण ०८:०३:४९ | पुण्यतिथी – आर्वी |
| योग:वज्र २८:२९:४८+ | तेलंगराय (वर्धा) |

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०११

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 6 | | 4 | 5 | | | |
| 4 | 3 | | | | | | 7 | |
| 1 | 5 | 8 | 9 | | | 6 | 2 | |
| 3 | 9 | | 8 | 1 | | | 6 | |
| | | | | | | | | |
| | 4 | | | 2 | 7 | | 9 | 5 |
| | 1 | 3 | | | 8 | 4 | 5 | 2 |
| | 8 | | | | | | 1 | 6 |
| | | | 2 | 3 | | 7 | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०१० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 1 | 4 | 8 | 6 | 3 | 2 | 7 |
| 3 | 2 | 8 | 7 | 1 | 9 | 5 | 6 | 4 |
| 6 | 7 | 4 | 2 | 3 | 5 | 1 | 8 | 9 |
| 7 | 8 | 3 | 1 | 9 | 2 | 6 | 4 | 5 |
| 2 | 4 | 6 | 5 | 7 | 3 | 8 | 9 | 1 |
| 9 | 1 | 5 | 6 | 4 | 8 | 2 | 7 | 3 |
| 1 | 5 | 7 | 8 | 2 | 4 | 9 | 3 | 6 |
| 4 | 3 | 2 | 9 | 6 | 1 | 7 | 5 | 8 |
| 8 | 6 | 9 | 3 | 5 | 7 | 4 | 1 | 2 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९३१ – किड चॉकलेट क्युबाचा पहिला जागतिक मुष्टीयोद्धा बनला.
- २००३ – नेटस्केप कम्युनेकेशनने एओएल टाईम वार्नर उधळून लावला आणि त्याच दिवशी मोझीला फाऊंडेशनचे स्थापना झाली.
- २००७ – बांगलादेशविरुद्ध श्रीलंकाने कसोटी मालिकेतील सर्व सामने डावाच्या फरकाने जिंकून क्रिकेट कसोटीच्या इतिहासातील तिसरा संघ म्हणून आपले नाव नोंदविले. यापूर्वी भारत व इंग्लंडने असे यश मिळवले आहे.

### राष्ट्रीय

- २००७ – आशियातील १० सर्वोत्कृष्ट शहरांमध्ये भारतातील उदयपुर व जयपूर शहरांचा समावेश झाला. अमेरिकन मासिक ट्रॅव्हल प्लस लीजर (न्यूयार्क) ने पर्यटकांना मिळणाऱ्या सुविधा विचारात घेऊन आशियातील १० शहरांची निवड केली.

### जन्म

- १३५३ – व्लादीमीर द बोल्ड, रशियाचा राजकुमार.
- १९०३ – कुमारस्वामी काम राज, भारतीय राजकारणी.
- १९७७ – फराज अन्वर, पाकिस्तानी विणावादक.

### निधन

- १२९१ – रोडल्फ पहिला, जर्मन–रोमन राजा.
- १९४६ – रेझर स्मिथ, इंग्लीश क्रिकेटपटू.
- १९७९ – गुस्तावो डीयाझ ओर्डझ, मेक्सिकोचे राष्ट्राध्यक्ष.
- २००८ – कैनोइंग (नौका शर्यत) मध्ये दोनदा ऑलम्पिक चॅम्पियन राहिलेला हंगेरीचा खेळाडू ग्रेगरी कोलोनिक्सचे निधन.

## : SMS :

Fiza mein mehakti  
saam ho tum,  
Pyaar mein jhalakta  
jaam ho tum  
Aur kaya kahe  
janam tere bare me  
Kharche ka dusra  
naam ho tum.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.२ | २५.२ |
| अहमदनगर | ३३.१ | २३.८ |
| अकोला | ३७.३ | ३२.२ |
| अमरावती | ३७ | ३१.१ |
| बीड | ३९.७ | ३४.३ |
| भंडारा | ३९.७ | ३४.१ |
| बुलढाणा | ४७.४ | ३९.६ |
| चंद्रपूर | ३९.९ | ३४.२ |
| चेन्नई | ४२.८ | ३६.६ |
| नवी दिल्ली | ४५.५ | ३८.७ |
| धुळे | ३८ | २९ |
| गोंदिया | ३८.५ | ३३.४ |
| जळगाव | ३७.४ | २९.३ |
| कोल्हापूर | ३१.७ | २३.५ |
| लातूर | ३५.५ | २६.५ |
| मुंबई | ३६.३ | ३४.६ |
| नागपूर | ३८.६ | ३४ |
| नांदेड | ३८ | ३१.८ |
| नंदूरबार | ३४.८ | २५.८ |
| नाशिक | ३२.३ | २४.८ |
| पुणे | ३०.२ | २२.९ |
| पंढरपूर | ३७.१ | २६.४ |
| सातारा | ३२.५ | २३ |
| सांगली | ३३.३ | २३.८ |
| सोलापूर | ३६.९ | २८.८ |
| वर्धा | ३८.७ | ३२.८ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** सामाजिक कार्यात यश मिळेल, कौतुक होईल. प्रगल्भ विचारसरणी यांतून आपल्या अडचणींवर सहजपणे मात कराल.

**वृषभ :** लेखक, शिक्षकांकडून चांगली कामगिरी होणार आहे. मन शांत राहिल्याने त्याचा व्यवसायावर चांगला परिणाम होईल.

**मिथुन :** जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना सुसंधी लाभतील.

**कर्क :** नावीण्यपूर्ण कलाकृतींचा ध्यास घ्याल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल.

**सिंह :** सतत शुभशकुनांचा सतत प्रत्यय येईल. गुरुची कृपा आपल्या प्रयत्नांना यश देईल. व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण करु शकाल.

**कन्या :** अपेक्षित गाठीभेटी झाल्याने मन प्रसन्न होईल. एखादा निर्णय अनपेक्षितपणे झटपट घेतला जाईल. आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील.

**तुळ :** अचानक अनावश्यक खर्च उद्भवतील. आपल्या आवडत्या छंदास व्यावसायिक स्वरुप देण्यास योग्य काळ आहे.

**वृश्चिक :** सार्वजनिक कामात यश मिळेल. मिष्टान्न भोजनाचे योग येतील. गुंतवणूकीतून लाभ होतील. आपल्या इच्छा, अपेक्षा कृतीत आल्याने समाधान लाभेल.


**धनु :** अनावश्यक खर्च उद्भवतील. आपली बाजू प्रभावीपणे मांडल्यामुळेच आपल्या मतांचा आदर केला जाईल. सांस्कृतिक कार्यक्रमातून आनंद लुटाल.

**मकर :** नोकरीतही अनपेक्षित चांगला बदल झाल्याने समाधान लाभेल. अधिकारावर असणाऱ्या स्त्री व्यक्तीकडून आपले लांबलेले काम होईल.

**कुंभ :** तरुणांना नोकरीत सुसंधी लाभतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. व्यवसायावर चांगला परिणाम होईल.

**मीन :** व्यवसायातील कामाचा वेग वाढेल. मिळालेल्या संधीचा लाभ आपले भविष्य उज्वल करणारा राहील. रचनात्मक कामातून लाभ होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०११



### आडवे शब्द

१. कातीव दगड  
३. नेहमी पटकन विसरणारा  
६. वाडवडील  
१०. आरडाओरडा, दंगा  
१२. दोस्त  
१३. व्याह्यांची बायको  
१४. अयोध्येची नदी  
१६. दाट, निबीड  
१८. पृथ्वी  
२०. उत्साह  
२१. हे खाऊन रूप येते का?  
२३. किडा  
२५. वाईट सवय  
२७. अस्थी  
२९. अंत:करण  
३१. पराक्रमी पुरुष  
३२. आदरणीय  
३३. दरवाजा  
३५. कापड इ.चा पृष्ठभाग  
३६. तृण  
३८. आच, उष्णता  
३९. घर  
४०. मातीच्या भांड्याचा तुकडा  
४१. वरणाची दाळ  
४२. निर्दय  
४३. उद्यान  
४४. जवळीक, मैत्री  
४७. स्वीकृत, अंगीकृत  
५०. अप्रिय, न आवडणारा  
५१. सुळका  
५१अ. अफवा, वदंता  
५२. बालीश  
५४. भगिनी  
५५. पुष्कळ  
५७. तंग  
५८. क्रीडा  
५९. वेखंड  
६०. कुरडईच्या जोडीने तळला जाणारा पदार्थ  
६१. बाण  
६३. बंध  
६४. विलंब  
६५. टिंगल  
६६. कायद्याला या हजार असतात!  
६९. चकित नजर  
७१. लाह्यांचा होम  
७४. बासरी  
७५. चुलता  
७७. उणे  
७८. न टाळण्याजोगे  
७९. बरोबरीचा  
८०. शर्विलक  
८१. झेप  
८३. घोडा  
८४. पुष्पगुच्छ  
८५. खेळातील चाल  
८६. आईचा भाऊ  
८७. गगन  
८८. रहायला घर नसलेला

### उभे शब्द

१. दिवा (हिंदी)  
२. वेडावाकडा  
४. यज्ञातील सरपण  
५. निशा  
६. अस्तनी  
७. नातवंडाचा मुलगा  
८. राष्ट्र  
९. वारा  
१०. डिंक  
११. ताजे, तरतरीत  
१३. स्वच्छ, निर्मळ  
१५. रूधिर  
१७. फांदी  
१९. सेपे  
२२. डोंगर  
२४. मसाल्याच्या पदार्थातील एक  
२६. धीर, बळ, उत्साह  
२८. व्याकूळ, व्याकूळ करणारे  
२९. बंदुकीची गोळी  
३०. विश्व  
३४. गंध, परिमळ  
३५. एक 'बोलका' पक्षी  
३७. रंग  
३८. अटकसत्र  
३९. कोडगा  
४०. संसद सदस्य  
४३. वक्रता  
४५. मीठ  
४६. वार्धक्य  
४८. भेग  
४८अ. उगाळलेल्या औषधाचा ओढा  
४९. आगेकूच  
५०. '... म्हणते रे गीत, परि सारे हलक्याने, आड येते रीत'  
५२. पोळ्या करण्याचे साधन  
५३. मिठी  
५४. नोकर  
५७. गृह  
६१. लाज  
६२. परिचय  
६५. सूत कातण्याचे साधन  
६७. आक्रोश  
६८. हट्ट  
७०. घट्ट दह्याची वडी  
७२. अग्नी  
७३. रगेल, माजखोर  
७६. चोळीचा एक प्रकार  
८१. पार्वती  
८२. एक अप्सरा  
८३. सध्या संकटात सापडलेला वन्य प्राणी

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०१० चे उत्तर

आडवे उत्तर : १.तांब्या ३.सालाबाद प्रमाणे ७.पसायदान १०.बदनामी १२.कीर १४.वलय १६.वाफ १७.पटाव १९.विलाप २१.मोड २१अ.जबान २२.काकी २३.शत्रुघ्न २५.गज २६.उमाळा २७.वावटळ २८.अन्य २९.वडील ३१.राजी ३३.भेजा ३४.टग्या ३५.पत ३६.परवानगी ३८.तस्त ४०.वाटप ४२.सौर ४३.राख ४४.रंक ४५.केशव ४६.बटीक ४७.वग ४९.वाहवा ५२.बंडलबाज ५४.रघुवीर ५८.यार ६०.गादी ६१.थाबा ६३.वजन ६५.अंगद ६७.म्यान ६८.विनाशकाले ७१.ठाव ७३.काक ७४.कमनीय ७७.जमीन ७९.अनावर ८१.गरुड ८२.गोरा ८३.गगन ८५.तरुणपण ८६.केली ८८.सागर ८९.थक्क ९०.नाद ९१.नड

उभे उत्तर : १.तांबडा २.ब्याद ३.सामील ४.बाकी ५.दरवाजा ६.मान्य ८.साठा ९.दाखला ११.नावड १३.लाट १५.यजमान १७.पाकीटमार १८.वश १९.विघ्न २०.पर्जन्य २१.मोजडी २२.बाळा २२अ.काव २४.त्रुटी २५.गवगवा २७.वाजी २८.अजातशत्रू ३०.लटपटीत ३१.रात ३२.जनक ३५.परवड ३६.पखवाज ३७.वारंवार ३९.स्तव ४१.टब ४८.गलथान ५०.दैवी ५१.जयाअंगी ५२.बंदी ५३.बाबा ५५.घुटका ५६.रव ५७.मौन ५९.रग ६२.विनाकारण ६४.जननी ६६.दशमी ६७.म्याव ६९.शठ ७०.लेकरू ७२.कनात ७५.मडके ७६.यथा ७७.जरासा ७८.नगर ८०.वरुण ८१.गणना ८४.नथ ८७.लीन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# ऑटोइम्यून मेंदूविकारावर ५५ दिवसांच्या ICU लढाईनंतर तरुणीची यशस्वी मात

पुणे (दै. संध्या)

वैद्यकीय तज्ज्ञता आणि वेळेवर करण्यात आलेल्या उपचारांचे उत्तम उदाहरण ठरलेल्या एका प्रकरणात, २१ वर्षीय विद्यार्थिनी अनिता सुर्वे (नाव बदललेले) हिने दुर्मिळ आणि गंभीर न्यूरोलॉजिकल आजार 'अँटी-एनएमडीए रिसेप्टर एन्सेफलायटिस'वर यशस्वी मात केली. सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, हडपसर, मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्क हॉस्पिटलमध्ये तब्बल ५५ दिवस चाललेल्या अतिदक्षता उपचारांनंतर ती पूर्णपणे बरी झाली.

पूर्वी कोणताही गंभीर वैद्यकीय इतिहास नसलेल्या अनिताला २८ जानेवारी रोजी गोंधळलेली मानसिक अवस्था, स्मरणशक्ती कमी होणे, वर्तनातील बदल आणि संज्ञानात्मक कार्यात बिघाड अशी तीव्र न्यूरोलॉजिकल लक्षणे दिसू लागल्यानंतर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिची प्रकृती झपाट्याने खालावत गेली आणि सतत एन्सेफालोपॅथी तसेच जनरलाइज्ड टॉनिक-क्लॉनिक आणि फोकल फिट्ससारखे वारंवार झटके येऊ लागले. त्यामुळे तिला तातडीने ICU मध्ये दाखल करून सतत न्यूरोमॉनिटरिंग करण्यात आले. सुरुवातीला कुटुंबीयांना तिच्या वर्तनातील बदल ही केवळ मानसिक किंवा वागणुकीशी संबंधित समस्या वाटत होती. ती गोंधळलेली राहणे, गोष्टी विसरणे आणि दैनंदिन कामांसाठी इतरांवर अवलंबून राहणे अशा समस्या अनुभवत होती. उपचारास थोडा वेळ लागला असला तरी त्याचा तिच्या आयुष्यावर मोठा सकारात्मक परिणाम झाला. उपचारांनंतर तिची स्मरणशक्ती परत आली आणि ती पुन्हा सामान्य आयुष्याकडे परतली.

रुग्ण सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, हडपसर, मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्क हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यानंतर डॉक्टरांनी प्रथम पल्स स्टेरॉइड्स आणि IVIG द्वारे उपचार सुरू केले. मात्र, या उपचारांनंतरही गंभीर न्यूरोलॉजिकल बिघाड कायम असल्याने डॉक्टरांनी प्रगत इम्युनोथेरपी 'रिटुक्सिमॅब'चा वापर केला. हा उपचार जटिल ऑटोइम्यून न्यूरोलॉजिकल विकारांमध्ये प्रभावी मानला जातो. डॉक्टरांनी स्पष्ट केले की, निदान आणि उपचारात होणारा विलंब मेंदूच्या पेशींना कायमस्वरूपी हानी पोहोचवू शकतो.

उपचारादरम्यान अनिताला अँटी-एपिलेप्टिक औषधांनंतरही 'स्टेटस एपिलेप्टिकस' ही जीवघेणी न्यूरोलॉजिकल आपत्कालीन अवस्था निर्माण झाली. त्यामुळे तिला इंट्यूबेशन आणि व्हेंटिलेटर सपोर्ट द्यावा लागला. दीर्घकाळ व्हेंटिलेटरची आवश्यकता



असल्याने तिची लवकर ट्रॅकिओस्टॉमी करण्यात आली.

याबाबत बोलताना सह्याद्रि सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, हडपसर, मणिपाल हॉस्पिटल्सच्या नेटवर्क हॉस्पिटलमधील क्रिटिकल केअर विभागाचे संचालक डॉ. कपिल बोरावके म्हणाले, "ICU मध्ये उपचार सुरू असताना अनिताला क्लेब्सिएला न्यूमोनिया आणि एंटेरोकोकस फेशियमसारख्या प्रतिरोधक जंतूंमुळे झालेल्या पॉलिमायक्रोबियल युरिनरी ट्रॅक्ट इन्फेक्शनचा सामना करावा लागला. अशा परिस्थितीत इम्युनोथेरपी आणि पल्स स्टेरॉइड्स यांचा योग्य समतोल राखत प्रगत अँटीमायक्रोबियल उपचार देणे अत्यंत महत्त्वाचे होते. सतत निरीक्षण, वैयक्तिकृत उपचार आणि वेळेवर हस्तक्षेप यांच्या मदतीने संसर्गावर नियंत्रण मिळवता आले आणि न्यूरोलॉजिकल सुधारणा कायम ठेवता आली."

अनेक गंभीर आव्हानांनंतरही अनितामध्ये हळूहळू पण सातत्याने न्यूरोलॉजिकल सुधारणा दिसून आली. सुरुवातीला अत्यल्प प्रतिसाद देणारी अनिता पुढे डॉक्टरांच्या सूचनांना प्रतिसाद देऊ लागली आणि हात-पायांच्या हालचालींमध्येही लक्षणीय सुधारणा झाली. अखेरीस झटके पूर्णपणे नियंत्रणात आले आणि डॉक्टरांनी तिची सेडेशन औषधे कमी केली. त्यानंतर तिला यशस्वीरित्या व्हेंटिलेटरवरून हटवण्यात आले, कमी ऑक्सिजन सपोर्टवर आणण्यात आले आणि ट्रॅकिओस्टॉमी ट्यूबही काढण्यात आली.

सुमारे दोन महिन्यांच्या अतिदक्षता आणि बहुविद्याशाखीय उपचारांनंतर २३ मार्च रोजी अनिताला स्थिर प्रकृतीत रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला. हा दुर्मिळ आणि जीवघेणा न्यूरोलॉजिकल विकारावर मिळवलेला महत्त्वपूर्ण विजय मानला जात आहे.

या दुर्मिळ प्रकरणाविषयी बोलताना डॉ. कपिल बोरावके म्हणाले, "अँटी-एनएमडीए रिसेप्टर एन्सेफलायटिस हा दुर्मिळ असला तरी वेळेवर निदान झाल्यास पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार आहे. या प्रकरणात गंभीर न्यूरोलॉजिकल गुंतागुंत आणि त्यासोबत संसर्ग असल्यामुळे उपचार अत्यंत आव्हानात्मक होते. मात्र वेळेवर निदान, बहुविद्याशाखीय उपचार पद्धती आणि संसर्ग नियंत्रणासह योग्य उपचार वाढवण्याची क्षमता यामुळे रुग्णाची प्रकृती सुधारू शकली."

गंभीर फिट्स, दीर्घ ICU उपचार, संसर्गाच्या पार्श्वभूमीवर इम्युनोथेरपी सुरू ठेवण्याचे आव्हान आणि तरीही मिळालेला सकारात्मक परिणाम यामुळे हे प्रकरण विशेष ठरते. या यशामागे इंटेन्सिव्हिस्ट, न्यूरोलॉजिस्ट, संसर्गरोग तज्ज्ञ, रुमॅटोलॉजिस्ट, पल्मोनोलॉजिस्ट, विशेष प्रशिक्षित नर्सिंग कर्मचारी आणि न्यूट्रिशनिस्ट यांच्या समन्वयात्मक कार्याची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### खडकवासला धरणकाठच्या बांधकामाबाबत तहसीलदारांचा महत्त्वाचा निर्णय

पुणे (दैनिक संध्या) : खडकवासला धरणाच्या काठावर गोऱ्हे खुर्द येथील कथित बेकायदा बांधकाम प्रकरणाची सातत्याने दखल घेतल्यानंतर महसूल प्रशासन अखेर सक्रिय झाले आहे. हवेलीच्या तहसीलदार अर्चना निकम यांनी महसूल मंडळ अधिकाऱ्यांना तातडीने स्थळपाहणी करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले असून, अहवालात नियमभंग आढळल्यास पुढील कारवाईसाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)कडे प्रस्ताव पाठविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. पुणे शहराला पिण्याचे पाणी पुरविणाऱ्या खडकवासला धरणाच्या अत्यंत संवेदनशील जलसाठा परिसरात सुरू असलेल्या या निवासी प्रकल्पामुळे जलसुरक्षा, पर्यावरण आणि लाखो पुणेकरांच्या आरोग्यावर संभाव्य परिणाम होऊ शकतो, अशी चिंता पर्यावरणप्रेमींकडून व्यक्त केली जात आहे. धरणाच्या अगदी काठालगत सुरू असलेल्या या बांधकामासाठी आवश्यक सर्व परवानग्या घेण्यात आल्या आहेत का, तसेच संबंधित नियमांचे पालन झाले आहे का, याची सखोल चौकशी करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे. महसूल प्रशासनाने या प्रकरणाची दखल घेतली असली, तरी जलसंपदा विभागाने अद्याप कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नसल्याने नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

### मार्केटयार्डात आषाढी वारीत 2 दिवसांत 4 ते 5 कोटींची उलाढाल

पुणे (दैनिक संध्या) : आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या कानाकोपऱ्यातून पुण्यात दाखल झालेल्या दिंड्यांनी पंढरपूरच्या दिशेने निघताना पुढील पंधरा दिवसांसाठी लागणारा शिधा गुलटेकडी मार्केटयार्डातून मोठ्या प्रमाणात खरेदी केला आहे. यामुळे तरकारी, फळे आणि गुळ-भुसार विभागातील व्यवहारांना आर्थिक चालना मिळाल्याचे दिसून आले. वारकऱ्यांच्या खरेदीमुळे बाजारात चार ते पाच कोटींची उलाढाल झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांसोबत पंढरपूरकडे जाणाऱ्या शेकडो दिंड्यांचे पुण्यात दोन दिवस मुक्काम असतो. या काळात दिंडीचालक आणि सेवेकरी पुढील पंधरा दिवसांच्या प्रवासासाठी लागणारा किराणा, भाजीपाला, मसाले आणि इतर जीवनावश्यक साहित्य मोठ्या प्रमाणावर मार्केटयार्डातून खरेदी करतात. मागील दोन दिवसांत भुसार विभागात तांदूळ, गहू, ज्वारी, तूर डाळ, हरभरा डाळ, साखर, मीठ, तेल, तिखट, हळद, धणे, जिरे, गरम मसाला, चहा, गूळ, रवा, मैदा आदी वस्तूंना मोठी मागणी राहिली. दरम्यान, अनेक दिंड्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर खरेदी करत असल्याने व्यापाऱ्यांची लगबग वाढली होती. तसेच भाजीपाला विभागात कांदा, बटाटा, लसूण, आले, हिरवी मिरची, टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, वांगी, भेंडी आणि इतर भाज्यांची मोठ्या प्रमाणावर खरेदी- विक्री झाली. शहरातील विविध संघटनांकडून आयोजित महाप्रसादाच्या कार्यक्रमाचा त्यावर जास्त प्रभाव राहिला. तर, दिंडी चालकांनी टिकाऊ भाज्यांना अधिक पसंती दिली त्यांकडून वाटेत कमी खराब होणाऱ्या भाज्यांची निवड करण्यात आली. अनेक दिंड्या दर दोन-तीन दिवसांनी पुढील मुक्कामाच्या ठिकाणी स्थानिक बाजारातून ताजा भाजीपाला खरेदी करत असल्याचे श्री शारदा गजानन अडते असोसिएशनचे अध्यक्ष अमोल घुले यांनी सांगितले.

### पुण्याला वर्षभरासाठी लागते 18 टीएमसी, धरणसाखळीत 10 महिने पुरेल इतका पाणीसाठा

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीत रविवारी १६.८० टीएमसी म्हणजे ५७.६३ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी याच दिवशी धरणसाखळीत २०.७९ टीएमसी पाणीसाठा होता. पुणे शहराला दर महिन्याला दीड टीएमसी पाण्याची गरज भासते. त्यानुसार वर्षभरासाठी १८ टीएमसी पाणी महापालिका जलसंपदा विभागाकडून उचलते. यंदा अद्यापही सुमारे ४ टीएमसी पाण्याची तूट कायम आहे. गेल्या आठवड्यात खडकवासला धरणसाखळीच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या जोरदार पावसामुळे धरणांतील पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ झाली. सध्या पानशेतमध्ये ६.३७ टीएमसी, वरसगावमध्ये ७.०६ टीएमसी, खडकवासला धरणात १.९३ टीएमसी आणि टेमघरमध्ये १.४४ टीएमसी पाणी साठले आहे. पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्यासाठी दरवर्षी सुमारे १८ टीएमसी पाण्याची प्रत्यक्ष गरज भासते. म्हणजेच शहराला ३६५ दिवस अखंड पाणीपुरवठा करायचा असेल, तर महिन्याला दीड टीएमसीप्रमाणे १८ टीएमसी पाणीसाठा आवश्यक असल्याचे महापालिकेच्या मागील वर्षीच्या आकडेवारीवरून स्पष्ट होते. सध्याचा १६.८० टीएमसी साठा हा सरासरी वापर गृहीत धरल्यास तो १० महिन्यांच्या पाणीपुरवठ्यासाठी पुरेसा ठरू शकतो. त्यामुळे उर्वरित मान्सूनमध्ये आणखी चांगल्या पावसाची गरज असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

## स्मार्ट मीटरमध्ये कॅमेरा असल्याचा खोटा आरोप; ग्राहक प्रतिनिधीसह संपादकाविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल

पुणे (दै. संध्या)

महावितरणच्या स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा खोटा आरोप करून आणि सोशल मीडियाद्वारे त्याचा हेतुपुरस्सर प्रसार करीत नागरिकांमध्ये भीती व दहशतीचे वातावरण निर्माण करणारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ग्राहक संघटनेचे नंदन मेघश्याम वेंगुर्लेकर व 'कोकणसाद' यूट्यूब न्यूज चॅनेलचे संपादक सागर चव्हाण यांच्याविरुद्ध सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) पोलीस ठाण्यात रविवारी (दि. १२) फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले.

या खोट्या आरोप प्रकरणी महावितरणकडून गंभीर दखल घेण्यात आली. स्मार्ट मीटरबाबत कपोलकल्पित तसेच नागरिकांमध्ये भीती व दहशत निर्माण होईल असे जाहीर व रेकॉर्डेड वक्तव्य केल्याप्रकरणी नंदन वेंगुर्लेकर आणि केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी ही खोटी माहिती सर्व सोशल मीडियाच्या खात्यांवरून प्रसारित केल्याप्रकरणी यूट्यूबचे संपादक सागर चव्हाण याच्याविरुद्ध जनतेत भीती निर्माण करून गुन्ह्यास चिथावणी देणे, गुन्हेगारी पद्धतीने धमकावणे, शांततेचा भंग करण्यासाठी जाणीवपूर्वक अपमान करणे, बदनामी करणेबाबत सावंतवाडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेनुसार कलम ३५३ (१) (बी), ३५१ (३), ३५२ व ३५६ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले. याप्रकरणी सावंतवाडी पोलीस पुढील तपास करीत आहे.




स्मार्ट मीटर हे पूर्णपणे सुरक्षित आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित आहेत. त्यात कोणताही 'कॅमेरा' किंवा गोपनीयतेचा भंग करणारी यंत्रणा नाही. वीजग्राहकांनी स्मार्ट मीटरबाबत पूर्णतः निश्चिंत राहावे. कोणत्याही कपोलकल्पित माहिती व खोटारड्या आरोपांना बळी पडू नये असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. स्मार्ट मीटरबाबत अत्यंत खोटी व काल्पनिक माहिती पसरवणाऱ्यांविरुद्ध फौजदारी तक्रार दाखल करण्यात येत असल्याचे देखील महावितरणतर्फे स्पष्ट करण्यात आले.

याबाबत माहिती अशी की, सावंतवाडी (जि. सिंधुदुर्ग) येथे कोकणसाद यूट्यूब न्यूज चॅनेलमध्ये स्मार्ट मीटर संदर्भात चर्चासत्र ठेवण्यात आले. त्यांचे रेकॉर्डिंग शुक्रवारी (दि. १०) सायंकाळी करण्यात आले. या चर्चासत्रामध्ये महावितरणकडून उपकार्यकारी अभियंता योगेंद्र वाघ, ग्राहक संघटनेचे नंदन वेंगुर्लेकर तसेच दीपक पटेकर सहभागी झाले होते. यामध्ये महावितरणकडून स्मार्ट मीटरबाबत विविध फायद्यांची माहिती देण्यात आली तसेच विविध आरोपांचे सर्मपक खुलासे करण्यात आले.

तथापि, या चर्चासत्रामध्ये नंदन वेंगुर्लेकर यांनी स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याचा धादांत खोटा आरोप केला. स्मार्ट मीटरमुळे नागरिकांच्या खाजगी आयुष्यावर पाळत ठेवली जात असल्याचा अत्यंत हास्यास्पद दावा त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून केला. याबाबत महावितरणचे श्री. वाघ यांनी त्याचवेळी स्पष्टीकरण दिले. तरीसुद्धा कोकणसाद यूट्यूब न्यूज चॅनेलने त्यांच्या इतर सोशल मीडियाच्या खात्यांवरून स्मार्ट मीटरमध्ये 'कॅमेरा' असल्याची खोटी जाहिरात केली आणि या चर्चासत्रातील संदर्भ वगळून दिशाभूल करणारा २ ते ३ मिनिटांचा भाग 'स्मार्ट मीटरची चिरफाड' या मथळ्याखाली रिलच्या माध्यमातून हेतुपुरस्सरपणे प्रसारित केला. त्यात महावितरणकडून करण्यात आलेला खुलासा देखील वगळण्यात आला.

## संजीव सोशल फाउंडेशनच्या 'वारकरी सेवा' अभियान

पुणे (दै. संध्या)

संजीव सोशल फाउंडेशनतर्फे संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यानिमित्त सलग दुसऱ्या वर्षी 'वारकरी सेवा अभियान आयोजित करण्यात आले होते. उपक्रमात हजारो वारकरी बांधवांनी विविध नि:शुल्क सेवांचा लाभ घेतला. अभियानांतर्गत बूट व चप्पल दुरुस्ती, बॅग दुरुस्ती, पायांची मालिश, महिला आराम कक्ष तसेच फराळ व दैनंदिन उपयोगाच्या वस्तूंच्या किटचे वाटप करण्यात आले. स्वयंसेवकांनी सेवाभावाने वारकऱ्यांची सेवा केली.

या सेवायज्ञास जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज यांच्या दहाव्या पिढीतील वंशज ह.भ.प. मुकुंद महाराज मोरे, ह.भ.प. नितीन महाराज मोरे तसेच ह.भ.प. सुप्रिया ताई साठे यांची उपस्थिती लाभली. यावेळी पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. विक्रमसिंह उमराज मोरे, ह.भ.प. लक्ष्मण दत्तात्रय मोरे, ह.भ.प. उमेश सुरेश मोरे, अध्यक्ष ह.भ.प. जालिंदर विश्वनाथ मोरे तसेच विश्वस्त ह.भ.प. गणेश उत्तम मोरे, ह.भ.प. वैभव अशोक मोरे आणि ह.भ.प. दिलीप नारायण मोरे उपस्थित होते.



छाया संजीव गदादे म्हणाल्या, वारकरी बांधवांच्या चेहऱ्यावरील समाधान आणि त्यांच्या मुखातून मिळणारे आशीर्वाद हीच आमच्या सेवाकार्यातील खरी कमाई आहे. वारकऱ्यांची सेवा करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य आहे. समाजातील दानशूर व्यक्ती, स्वयंसेवक आणि सहकाऱ्यांच्या सहकार्यामुळे हा सेवायज्ञ यशस्वी झाला. भविष्यातही अधिक व्यापक स्वरूपात आणि अधिक सेवाभावाने हे अभियान सुरू ठेवण्याचा आमचा संकल्प आहे.

या अभियानाच्या यशस्वी आयोजनासाठी संजीव सोशल फाउंडेशनचे पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक व सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी मुळे या उपक्रमाचे वारकरी बांधव व मान्यवरांनी कौतुक केले.

## पोलिस दलात मनुष्यबळाचा तुटवडा; १२ नवीन पोलिस ठाण्यांसह ४० चौक्यांच्या विस्तारासमोर मोठे आव्हान

पुणे (दै. संध्या)

दिवसेंदिवस शहराचा झपाट्याने होणारा विस्तार, वाढती लोकसंख्या आणि गुन्हेगारीचे बदलते स्वरूप पाहता पुण्यात नवीन १२ पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली. तसेच ४० नवीन पोलिस चौक्या सुरू करण्याचा नुकताच आराखडा तयार करण्यात आला आहे. मात्र, अधिकारीवर्गातील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे पोलिस ठाणे, चौक्यांचे कामकाज प्रभावीपणे कसे चालविणार, हा प्रश्न उपस्थित झाला आहे. विशेषतः पुणे शहर पोलिस आयुक्तालयात मंजूर असलेल्या अधिकारी संख्येपैकी ३५ टक्के अधिकाऱ्यांची संख्या कमी आहे. त्यामध्ये पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदांवरील तब्बल २११ रिक्त जागांमुळे मनुष्यबळाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.




सध्या पुणे शहर पोलिस आयुक्तालयाच्या अखत्यारीत ४५ पोलिस ठाणे आणि ११० पोलिस चौक्या कार्यरत आहेत. वाढत्या शहराच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत किमान तीन चौक्या असाव्यात, या उद्देशाने तीनपेक्षा कमी चौक्या असलेल्या २३ पोलिस ठाण्यांच्या हद्दीत ४० नवीन चौक्या सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. तर, पोलिस ठाणे चालविण्यासाठी किमान दहा अधिकाऱ्यांची गरज असते. तेव्हाच त्या पोलिस ठाण्याचे काम प्रभावीपद्धतीने चालू शकते.

मात्र, अधिकाऱ्यांची संख्या उपलब्ध नसल्याने नियोजनाची अंमलबजावणी अडचणीत येण्याची चिन्हे आहेत. पोलिस निरीक्षक (पीआय) संवर्गातील १८८ मंजूर पदांपैकी १६, सहाय्यक पोलिस निरीक्षक (एपीआय) संवर्गातील २६४ पदांपैकी १९, तर पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) संवर्गातील ५९९ मंजूर पदांपैकी तब्बल २११ पदे रिक्त आहेत. पीएसआय संवर्गातील जवळपास ३५ टक्के पदे रिक्त असल्याने अनेक अधिकाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

## पुणे मेट्रोतील कंत्राटी कामगारांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतनवाढ लागू

### भारतीय मजदूर संघाच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; मेट्रो व्यवस्थापनाचा सत्कार

पुणे (दै. संध्या)

पुणे मेट्रो रेल प्रकल्पातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतन लागू करण्याच्या दीर्घकालीन मागणीला अखेर यश आले असून, महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (Maha-Metro) यांनी पुणे मेट्रोतील पात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांना केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतन लागू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेत अंमलबजावणी सुरू केली आहे. या निर्णयामुळे कामगारांच्या वेतनात लक्षणीय वाढ झाली असून, हा निर्णय पुणे मेट्रोतील कंत्राटी कामगारांसाठी ऐतिहासिक ठरणार आहे.

पुणे मेट्रो रेल कामगार संघ रजि 5299 दि 10/09/2025 (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांनी या मागणीसाठी सातत्याने महाराष्ट्र शासन, माननीय कामगार मंत्री तसेच मेट्रो व्यवस्थापनाकडे पाठपुरावा केला होता. यापूर्वी कामगारांना महाराष्ट्र शासनाच्या Shops and Establishments नियमांनुसार वेतन दिले जात होते. मात्र, कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटनेने सातत्याने केलेल्या प्रयत्नांमुळे आता केंद्रीय वेतनश्रेणीनुसार वेतन लागू करण्यात आले आहे.

या ऐतिहासिक निर्णयाबद्दल पुणे मेट्रो रेल कामगार संघ (संलग्न भारतीय मजदूर संघ) यांच्या वतीने महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक मा. श्री. श्रावण हर्डीकर तसेच मानव संसाधन विभागाचे (HR) वरिष्ठ अधिकारी श्री. उत्तमराव बोडके यांचा वृक्षाचे रोप देऊन



सत्कार करण्यात आला. यावेळी व्यवस्थापनाने कामगारांच्या हितासाठी घेतलेल्या सकारात्मक निर्णयाचे स्वागत करण्यात आले.

सत्कार समारंभास पुणे मेट्रो रेल कामगार संघाचे अध्यक्ष राम सुरवसे, जनरल सेक्रेटरी सचिन मेंगाळे, भारतीय मजदूर संघ, पुणे जिल्हाध्यक्ष अर्जुन चव्हाण, संघटन सचिव बाळासाहेब भुजबळ, उमेश विश्वाद, कैलास मोरे, सुवर्णा भोसले, विल्यम आणि ऋषीकेश यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संपूर्ण प्रक्रियेत निकिता दंडवते, कैलास मोरे, गौरी साळुंखे, योगिता देवणे, यश निंबाळकर आणि रेखा फडके रवींद्र वाघोले, राज शेलार, लक्ष्मण गवस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण समन्वय, पाठपुरावा आणि संघटनात्मक कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. संघटनेच्या वतीने त्यांच्या योगदानाबद्दल सर्व कामगारांच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी केंद्रीय वेतनश्रेणीची अंमलबजावणी करून त्यांच्या वेतनात ऐतिहासिक वाढ घडवून आणल्याबद्दल महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापनाचे तसेच या मागणीसाठी सातत्यपूर्ण नेतृत्व, मार्गदर्शन आणि संघर्ष करणाऱ्या भारतीय मजदूर संघ व पुणे मेट्रो रेल कामगार संघ यांच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

संघटनेने स्पष्ट केले की, भविष्यातही पुणे मेट्रोतील सर्व कंत्राटी कामगारांना न्याय्य वेतन, सामाजिक सुरक्षा, सेवा संरक्षण आणि इतर कायदेशीर हक्क मिळवून देण्यासाठी भारतीय मजदूर संघाचा संघर्ष आणि सकारात्मक संवाद यापुढेही अविरत सुरू राहील.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### विश्वबंधुता साहित्य परिषदेतर्फे आयोजित तिरंगा महोत्सवाच्या अध्यक्षपदी प्रकाश रोकडे




पुणे (दैनिक संध्या) : क्रांती दिन आणि स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर होत असलेल्या 'विश्वबंधुतेचा तिरंगा महोत्सव'च्या अध्यक्षपदी विश्वबंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांची, तर स्वागताध्यक्षपदी विश्वबंधुता काव्यमंचचे अध्यक्ष डॉ. बंडोपंत कांबळे यांची निवड करण्यात आली आहे, अशी माहिती परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी दिली. रोकडे यांनी नुकतेच २८ व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. महोत्सवाच्या नियोजनासाठी प्रा. शरयू पवार, प्रा. भारती जाधव, प्रा. सायली गोसावी, सुलभा निवंगुणे आणि प्रा. प्रशांत रोकडे यांनी विशेष पुढाकार घेतला आहे, असेही शंकर आथरे यांनी नमूद केले.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची प्रक्रिया घटनेनुसार : सुनिल तटकरे

मुंबई (दैनिक संध्या) : राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष पदाची प्रक्रिया घटनेनुसार... कायद्यानुसार व नियमानुसारच आहे असे ठाम मत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. दरम्यान यासंदर्भात कोअर कमिटीच्या बैठकीत संबंधितांवर पक्षशिस्तभंग किंवा अन्य कारवाईचा विचार केला जाईल असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले. सच्चिदानंद सिंह यांनी जी नोटीस वजा पत्र पाठवले आहे. त्यात सकृतदर्शनी बिलकुल तथ्य नाही असे सांगतानाच वहिनींची अध्यक्ष पदाची निवड करण्यासाठी राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक लावण्यात आली आणि ती नियमानुसारच होती... कामकाजही नियमानुसार झाले आणि झालेली निवडही वैध पध्दतीने झालेली आहे असेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले. त्यांनी जी काही नोटीस दिली आहे त्यासंदर्भात लवकरच कोअर कमिटीची बैठक होईल आणि वकीलांचा व तज्ज्ञांचा सल्ला घेऊन पुढील कारवाई करु असेही सुनिल तटकरे यांनी सांगितले. माझा त्या व्यक्तीशी संवाद झालेला नाही. आणि दिल्ली पातळीवर काही झाले असेल तर मला ज्ञात नाही. त्यामुळे आम्ही आज किंवा उद्या यासंदर्भातील कोअर कमिटीची बैठक घेऊन कायदेशीर वैधता तपासू मात्र या नोटीसमध्ये कोणतेही तथ्य नाही असे वैयक्तिक मतही सुनिल तटकरे यांनी व्यक्त केले. कुणी एखादी व्यक्ती पत्र लिहिते याचा अर्थ पक्षात असंतोष आहे हे मानणेच चुकीचे आहे. कुण्या एका व्यक्तीचे मत म्हणजे पक्ष नाही. पक्ष पक्षाच्या भूमिकेतून वाटचाल करत असतो. विशेष करून वहिनींच्या नेतृत्वाखाली एकसंघपणाने पक्ष वाटचाल करत आहे. पक्ष लोकशाही मार्गाने चालत आहे असेही पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले.

### प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे रविवारी 'दिग्गजांच्या मुलाखती' कार्यक्रमाचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : प्राचीन संहिता गुरुकुलातर्फे वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या संकल्पनेतून 'दिग्गजांच्या मुलाखती' या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. येत्या रविवारी (ता. १९ जुलै) सायंकाळी ५ ते ९ या वेळेत श्री गणेश सभागृह, न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रस्ता, पुणे येथे होणार आहे. या कार्यक्रमात राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह व ज्येष्ठ आयुर्वेद अभ्यासक वैद्य प्रवीण जोशी यांच्याशी संवाद साधण्यात येणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला आहे. आयुर्वेदातील संशोधन, शिक्षण आणि नवोन्मेष यांचा संगम घडवून आणणाऱ्या वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांच्या विविध उपक्रमांनी यंदा अनेक महत्त्वाचे टप्पे गाठले आहेत. भारतातील पहिल्या आयुर्वेदिक केश-त्वचा परीक्षण प्रयोगशाळा व संशोधन केंद्र केशायुर्वेद व कायायुर्वेदच्या यशस्वी वाटचालीचा कार्यपूर्तीचा सोहळा, तसेच प्राचीन संहिता गुरुकुलच्या शंभर यशस्वी बॅचेस पूर्ण झाल्याचा अभिमानास्पद क्षण, या सर्वांचा एकत्रित उत्सव म्हणून 'दिग्गजांच्या मुलाखती' या वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून वैद्य डॉ. हरीश पाटणकर यांनी आयुर्वेद क्षेत्रात निदान, संशोधन, उपचार आणि शिक्षण या चारही स्तरांवर सातत्याने कार्य केले आहे. केश व त्वचा विकारांच्या आयुर्वेदाधिष्ठित निदानासाठी विकसित करण्यात आलेल्या प्रयोगशाळा, तसेच हजारो विद्यार्थ्यांना व्यावहारिक आयुर्वेदाचे प्रशिक्षण देणारे प्राचीन संहिता गुरुकुल, या उपक्रमांमुळे राज्यासह देशभरातील विद्यार्थी, वैद्यकीय व्यावसायिक आणि रुग्णांमध्ये वेगळी ओळख निर्माण झाली आहे. कार्यक्रमामध्ये आयुर्वेद क्षेत्रातील मान्यवर, डॉक्टर, विद्यार्थी, संशोधक तसेच नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

### लाडकी बहिण योजनेबाबत काँग्रेस-उबाठाचे दावे दिशाभूल करणारे : संजय निरुपम

मुंबई (दैनिक संध्या) : लाडकी बहिण योजनेतून ९२ लाख महिलांना वगळले, सरकारचे १४ हजार कोटी वाया गेले, अशी दिशाभूल करुन काँग्रेस आणि उबाठा या सावत्र भावांकडून राजकारण सुरु आहे, अशी टीका शिवसेना प्रवक्ते संजय निरुपम यांनी केली. लाडकी बहिण योजनेत पात्रता निश्चितीसाठी ईकेवायसीला मुदतवाढ द्यावी, अशी मागणी निरुपम यांनी यावेळी केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. संजय निरुपम म्हणाले की, लाडकी बहिण योजनेत सरकारचे १४ हजार कोटी वाया गेले, असा हास्यास्पद दावा काँग्रेस आणि उबाठाचे नेते करत आहेत. या योजनेतून ९२ लाख महिलांना वगळले हा विरोधकांचा दावा देखील साफ खोटा आहे.




# 'आईकु झेड११ लाइट' २४ जुलैला होणार दाखल

■ नवीन कार्यप्रणाली, मोठी बॅटरी, लष्करी दर्जाची मजबुती आणि चार वर्षांची सुरक्षा अद्यतने; महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना लक्षात घेऊन स्मार्टफोनची निर्मिती

नवी दिल्ली (दै. संध्या) :

उच्च कार्यक्षमतेच्या स्मार्टफोनसाठी ओळखला जाणारा आईकु हा ब्रँड २४ जुलै रोजी आपला नवीन आईकु झेड११ लाइट हा स्मार्टफोन भारतीय बाजारात सादर करणार आहे. विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आलेल्या या स्मार्टफोनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित अनेक आधुनिक सुविधा, मोठी बॅटरी, मजबूत बांधणी आणि आकर्षक रचना देण्यात आली आहे. ऑनलाइन व्याख्याने, असाइनमेंट तयार करणे, नोंदी लिहिणे, दैनंदिन अनेक कामे एकाच वेळी हाताळणे आणि मनोरंजन अशा सर्व गरजांसाठी हा स्मार्टफोन उपयुक्त ठरेल, असा कंपनीचा दावा आहे.

कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, "अखंड शिक्षण, अखंड कार्यक्षमता" या संकल्पनेवर आधारित हा स्मार्टफोन विकसित करण्यात आला असून तो नवीन ओरिजिन ओएस ६ या कार्यप्रणालीवर चालणार आहे. यासोबतच ग्राहकांना चार वर्षांची सुरक्षा अद्यतने मिळणार असल्यामुळे दीर्घकाळ सुरक्षित वापराचा अनुभव मिळेल.

आईकु झेड११ लाइटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यामधील कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा. एआय क्रिएशन या सुविधेमुळे मोठ्या दस्तऐवजांचा काही क्षणांत सारांश तयार करता येतो, मजकूर नव्याने लिहिता येतो, भाषांतर करता येते तसेच नवीन कल्पना आणि लेखनासाठी आवश्यक सूचना मिळतात. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा वेळ वाचून काम अधिक परिणामकारकपणे करता येणार आहे. याशिवाय एआय कॅप्शन ही सुविधा व्याख्याने, कार्यशाळा किंवा चर्चेदरम्यान बोललेला मजकूर तत्काळ लेखी स्वरूपात उपलब्ध करून देते. त्याचबरोबर त्याचे भाषांतर आणि सारांशही एका स्पर्शात तयार होतो. त्यामुळे महत्त्वाच्या नोंदी तयार करणे, त्या पुन्हा वाचणे किंवा इतरांसोबत शेअर करणे अधिक सोपे होणार आहे.

या स्मार्टफोनमध्ये ६,५०० एमएएच क्षमतेची मोठी बॅटरी देण्यात आली असून ती ४४ वॅट जलद चार्जिंगला समर्थन देते. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिवसभर अभ्यास, ऑनलाइन वर्ग, मनोरंजन आणि इतर कामांसाठी वारंवार चार्जिंगची गरज भासणार नाही.

यासोबतच कंपनीने पाच वर्षे बॅटरीची कार्यक्षमता टिकवून ठेवणारे तंत्रज्ञान दिले आहे. त्यामुळे दीर्घकाळ वापरानंतरही बॅटरीची क्षमता टिकून राहण्यास मदत होईल.

महाविद्यालयीन जीवनातील दैनंदिन धावपळ, प्रवास, बॅगमधील वापर, चुकून पडणे किंवा पाणी सांडणे यांसारख्या परिस्थिती लक्षात घेऊन या स्मार्टफोनची रचना करण्यात आली आहे. यामध्ये लष्करी दर्जाची टिकाऊपणा चाचणी तसेच एसजीएस पाच-तारांकित पडझड प्रतिकार प्रमाणपत्र देण्यात आले आहे. त्यामुळे दैनंदिन वापरात अधिक सुरक्षितता आणि मजबुती मिळणार आहे.

'मेक इन इंडिया' उपक्रमाला पाठबळ देत या स्मार्टफोनचे उत्पादन ग्रेटर नोएडा येथील विवोच्या उत्पादन केंद्रात करण्यात येणार आहे. तसेच विक्रीनंतरची सेवा अधिक सक्षम करण्यासाठी देशभरातील ६७० हून अधिक कंपनीच्या सेवा केंद्रांवर ग्राहकांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे कंपनीने सांगितले आहे.

२४ जुलै रोजी होणाऱ्या या स्मार्टफोनच्या लाँचकडे विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थी आणि तंत्रज्ञानप्रेमींचे लक्ष लागले असून, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सुविधा, मोठी बॅटरी, मजबूत बांधणी आणि दीर्घकालीन सॉफ्टवेअर अद्यतनांमुळे हा स्मार्टफोन मध्यम किमतीच्या बाजारपेठेत महत्त्वाचा पर्याय ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

#### आकर्षक रंग आणि आधुनिक रचना

आईकु झेड११ लाइट सोलर फ्लेम आणि मिडनाईट ब्लू या दोन आकर्षक रंगांमध्ये उपलब्ध होणार आहे. आधुनिक आणि आकर्षक रचना, लहान आकाराचा कॅमेरा विभाग तसेच कॉल आणि सूचना मिळाल्यावर उजळणारे डायनॅमिक दिवे यामुळे हा स्मार्टफोन तरुण वर्गाला आकर्षित करेल.

## पुरी रथयात्रेपूर्वी एअरटेलने संपूर्ण ओडिशामधील आपले नेटवर्क अधिक मजबूत केले

■ गेल्या 12 महिन्यांत एअरटेलने राज्यभरात 1,500 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारल्या असून, 1.1 कोटींहून अधिक ग्राहकांना हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून दिली आहे.

भुवनेश्वर (दै. संध्या) :

भारतातील आघाडीच्या दूरसंचार सेवा प्रदाता कंपन्यांपैकी एक, भारती एअरटेल ("एअरटेल") ने पुरी रथयात्रेच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण ओडिशामध्ये आपल्या व्यापक नेटवर्क विस्ताराची घोषणा केली. वार्षिक रथयात्रेदरम्यान व्हॉइस आणि डेटा ट्रॅफिकमध्ये होणारी मोठी वाढ लक्षात घेऊन, एअरटेलने आगाऊ तयारीचा भाग म्हणून पुरीमधील आपल्या नेटवर्क इन्फ्रास्ट्रक्चरला अधिक मजबूत केले आहे. यामध्ये पवित्र नगरीकडे जाणारे सर्व प्रमुख रस्ते आणि रेल्वे मार्गांचा समावेश आहे. 5G सेवेसह सुसज्ज असलेला हा विस्तार नेटवर्कवरील अपेक्षित वाढीव मागणी प्रभावीपणे हाताळण्यासाठी तसेच भाविकांची सर्वाधिक गर्दी असताना हाय-स्पीड डेटा सेवांसह अखंड व्हॉइस कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी करण्यात आला आहे. गेल्या 12 महिन्यांत कंपनीने राज्यभरात 1,500 हून अधिक नवीन 5G साइट्स उभारल्या आहेत. त्यामुळे ओडिशातील 30 जिल्ह्यांमध्ये तिचे नेटवर्क कव्हरेज लक्षणीयरीत्या मजबूत झाले असून, शहरी भाग, विकसित होत असलेली शहरे तसेच ग्रामीण समुदायांमध्ये राहणाऱ्या 1.1 कोटींहून अधिक ग्राहकांना विश्वासार्ह हाय-स्पीड कनेक्टिव्हिटी उपलब्ध होत आहे.

## वीज वितरण व्यवस्थेवर वाढता ताण : तातडीने उपाययोजनांची गरज

मुंबई (दै. संध्या) :

महाराष्ट्रात वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याची समस्या आता केवळ तात्पुरती अडचण राहिलेली नाहीत, या घटनांमुळे राज्याच्या वीज वितरण व्यवस्थेतील उणिवा समोर येत आहेत. नागपुरातील ट्रान्सफॉर्मर बिघाड, मुंबईतील दीर्घकाळ वीज खंडित होणे आणि नवी मुंबईतील नागरिकांच्या आंदोलनांमुळे वाढती वीज मागणी, अतिवृष्टी आणि उष्णतेच्या काळात वितरण यंत्रणेवर मोठा ताण येत असल्याचे दिसून येत आहे.

मुंबई आणि आसपासच्या भागात वेगाने वाढणारे शहरीकरण होत असल्याने वीज वितरण यंत्रणेचा वेळेवर विस्तार आणि आधुनिकीकरण करणे आवश्यक झाले आहे. यंदाच्या उन्हाळ्यात खारघरसारख्या भागांत सहा तास वीजपुरवठा बंद होता. नागपुरात विक्रमी वीज मागणीमुळे ट्रान्सफॉर्मर बिघाड झाले आणि अनेक भागांत दीर्घकाळ वीज खंडित झाली, तर पुण्यात काही भागांमध्ये 24 तासांहून अधिक काळ वीजपुरवठा बंद राहिला, तर नवी मुंबईत वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्याच्या घटनांमुळे नागरिकांनी आंदोलन केले. ट्रान्सफॉर्मरवरील वाढता ताण, दुरुस्तीत होणारा विलंब आणि अपुरे नियोजन याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

वारंवार होणाऱ्या वीज खंडित होण्यामुळे केवळ दैनंदिन जीवन विस्कळीत होत नाही, तर विद्युत सुरक्षेचे आणि ग्राहकांच्या सुरक्षेचेही प्रश्न निर्माण होतात. व्होल्टेजमधील चढ-उतारांमुळे विद्युत उपकरणांचे नुकसान होऊ शकते. काही ठिकाणी ट्रान्सफॉर्मर बिघाडाच्या घटनांमुळे विद्युत सुरक्षिततेबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली असून, वीज वितरण यंत्रणेची नियमित देखभाल आणि आधुनिकीकरणाची गरज अधोरेखित झाली आहे. याशिवाय, वीज कंपन्यांकडून वेळेवर माहिती न मिळणे आणि तक्रारींवर उशिरा प्रतिसाद मिळाल्यामुळे ग्राहकांचा विश्वास कमी होत आहे. दीर्घकाळ वीज नसल्याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि सतत वीजेवर अवलंबून असलेल्या रुग्णांना बसतो. विशेषतः उष्णतेच्या काळात अशा घटना सार्वजनिक आरोग्य आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी गंभीर ठरू शकतात.

समता पॉवरचे संचालक डी. डी. अग्रवाल यांच्या मते, अलीकडील वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे वीज वितरण यंत्रणेची नियमित तपासणी, देखभाल आणि दीर्घकालीन नियोजन अधिक मजबूत करणे आवश्यक झाले आहे. त्यांच्या मते, बिघाड झाल्यानंतर दुरुस्ती करण्यापेक्षा उपकरणांची वेळोवेळी तपासणी करून आधीच आवश्यक देखभाल केल्यास अनेक समस्या टाळता येऊ शकतात. ते पुढे म्हणाले की, मोठ्या प्रमाणावर वीज खंडित झाल्यास पुरेसे मनुष्यबळ आणि आवश्यक संसाधने उपलब्ध असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यावरच वीजपुरवठा किती लवकर पूर्ववत होईल, हे अवलंबून असते. आधुनिक वीज वितरण व्यवस्थेत प्रेडिक्टिव्ह मेंटेनन्स (आधीच बिघाडाचा अंदाज घेऊन देखभाल), डिजिटल मॉनिटरिंग आणि नियोजनबद्ध मालमत्ता व्यवस्थापनाचा प्रभावी वापर केल्यास वीजपुरवठा अधिक विश्वासार्ह आणि सुरळीत ठेवता येऊ शकतो.

## भारताचा पहिला नीट रेडी लॅपटॉप लॉन्च

■ एसर, इंटेल आणि इन्फिनिटी लर्न यांनी भारतातील पहिलं एकत्रित NEET CBT रेडी इकोसिस्टम सादर केलं

नवी दिल्ली (दै. संध्या) :




2027 पासून NEET परीक्षा कॉम्प्युटर-बेस्ड टेस्ट (CBT) स्वरूपात होणार आहे. या बदलासाठी विद्यार्थ्यांना टेक्नॉलॉजी, शिकण्याचं इकोसिस्टम आणि डिजिटल आत्मविश्वास देण्यासाठी जागतिक टेक्नॉलॉजी नेते एसर आणि इंटेल, तसेच स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी अग्रगण्य प्लॅटफॉर्म इन्फिनिटी लर्न श्री चैतन्या एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्सची पुढाकार यांनी एकत्र येऊन भारताचं पहिलं NEET रेडी इकोसिस्टम तयार केलं आहे. या सहकार्याचा पहिला परिणाम म्हणून, एसर, इंटेल आणि इन्फिनिटी लर्न यांनी भारताचं पहिलं NEET रेडी लॅपटॉप सादर केलं आहे. हे लॅपटॉप विद्यार्थ्यांना आवश्यक टेक्नॉलॉजी, शिकण्याचं इकोसिस्टम आणि डिजिटल आत्मविश्वास देतं, ज्यामुळे NEET CBT कडे होणाऱ्या संक्रमणासाठी ते पूर्णपणे तयार होऊ शकतात.

एसरच्या विश्वासार्ह अस्पायर सिरीज लॅपटॉप्स, इंटेलच्या अॅडव्हान्स्ड कम्प्युटिंग टेक्नॉलॉजीज आणि इन्फिनिटी लर्न च्या AI-पॉवर्ड NEET तयारी इकोसिस्टमचं एकत्रीकरण या सहकार्यामुळे झालं आहे. यामुळे भारतातील उदयोन्मुख शिक्षणातील मोठ्या आव्हानाला उत्तर देणारं पहिल्यांदाच असं सोल्यूशन तयार झालं आहे. प्रत्येक विद्यार्थी उच्च-स्तरीय कॉम्प्युटर आधारित परीक्षा साठी डिजिटलरी तयार असणं. दरवर्षी 22 लाखांहून अधिक विद्यार्थी NEET, भारतातील सर्वात मोठी अंडरग्रॅज्युएट मेडिकल प्रवेश परीक्षा, देतात. आता ही परीक्षा कॉम्प्युटर-बेस्ड टेस्टिंग (CBT) स्वरूपात होणार असल्यामुळे तयारीसाठी शैक्षणिक उत्कृष्टतेसोबतच डिजिटल आत्मविश्वासाचीही गरज भासणार आहे. सुमारे 70% NEET परीक्षार्थी टियर 2, टियर 3 आणि ग्रामीण भारतातून येतात, त्यामुळे वैयक्तिक कम्प्युटिंग डिव्हाइसचा प्रवेश अजूनही असमान आहे. विद्यार्थी CBT कडे होणाऱ्या बदलासाठी तयारी करत असताना, या भागीदारीमुळे विश्वासार्ह टेक्नॉलॉजी आणि सिद्ध NEET तज्ज्ञता एकत्र येऊन त्यांना शिकण्यात आणि डिजिटल परीक्षेत आत्मविश्वास निर्माण करण्यास मदत होते. 2027 पासून NEET CBT कडे होणाऱ्या संक्रमणात विद्यार्थ्यांच्या यशाला पाठबळ देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या या ऑफरिंगमध्ये इंटेल प्रोसेसरसह एसर अस्पायर लॅपटॉप्स आहेत, जे विद्यार्थ्यांना शिकण्यासाठी, प्रॅक्टिससाठी आणि कॉम्प्युटर आधारित परीक्षा साठी आवश्यक परफॉर्मन्स आणि क्षमता देतात. हे लॅपटॉप्स इन्फिनिटी लर्न च्या सर्वसमावेशक NEET तयारी इकोसिस्टमसह प्री-लोडेड आहेत.

## चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी किशोर भोसले; सचिवपदी राऊत

चाकण(दै. संध्या) :




चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी येथील उद्योजक किशोर भोसले यांची, तर डॉ.भरत राऊत यांची सचिव पदी नियुक्ती करण्यात आली. चाकण रोटरी क्लबच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या रोटरी क्लबच्या पदग्रहण समारंभात किशोर भोसले यांची अध्यक्षपदी, डॉ. भरत राऊत यांची सचिव पदी तर डॉ. विजय भवारी यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. रोटरी ३१३१ चे जिल्हा प्रांतपाल नितीन धमाले यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना आपापले अधिकार प्रदान करण्यात आले. यावेळी खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, नगराध्यक्षा मनिषा गोरे, सहाय्यक प्रांतपाल शिवाजी टाकळकर, डॉ. नीलम धमाले, डॉ. विद्या भोसले आदींच्या प्रमुख उपस्थितीत पदग्रहण समारंभ मोठ्या दिमाखात संपन्न झाला. रोटरीचे नवनिर्वाचित अध्यक्ष किशोर भोसले व सचिव डॉ. भरत राऊत यांनी यावेळी सांगितले की," चाकण रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन नवनवीन उपक्रम राबविणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, नेत्र शिबिर, वृक्षारोपण, शालेय साहित्यांचे वाटप, अनाथांना मदत, व्याख्यानमाला आदी उपक्रमांवर विशेष भर देणार आहे."

# सुमीत ग्रुप आणि सुमीत एसएसजीकडून वारकऱ्यांना वैद्यकीय मदत



## अत्याधुनिक रुग्णवाहिकांमुळे दोन जणांचे प्राण वाचले

पिंपरी चिंचवड (दै. संध्या) :

सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस आणि सुमीत एसएसजी यांनी आषाढी वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी विशेष वैद्यकीय मदत उपक्रम राबविला. या उपक्रमात दोन जणांचे प्राण वाचवण्यात यश आले असून, शेकडो वारकऱ्यांना औषधे आणि प्राथमिक उपचार देण्यात आले.

हा उपक्रम ९ ते ११ जुलैदरम्यान राबविण्यात आला. यावेळी पिंपरी, भोसरी, ज्ञानेश्वर पादुका चौक (एफसी रोड), भवानी पेठ, रास्ता पेठ, हडपसर, लोणी काळभोर आणि दिवे घाट अशा एकूण आठ ठिकाणी वैद्यकीय शिबिरे आयोजित करण्यात आली.

या शिबिरांमध्ये मोठ्या प्रमाणात वारकरी उपचारासाठी आले होते. या शिबिरांमधील डॉक्टरांनी डिहायड्रेशन, स्नायूंचा थकवा, पायांना आलेले फोड आणि सांधेदुखी यांसारख्या समस्यांनी त्रस्त असलेल्या भाविकांच्या समस्यांवर उपचार केले. या उपक्रमासाठी सुमीत एसएसजीने एक अॅडव्हान्स्ड लाइफ सपोर्ट (ALS) आणि दोन बेसिक लाइफ सपोर्ट (BLS) रुग्णवाहिका तैनात केल्या होत्या. या रुग्णवाहिकांमध्ये आधुनिक आणि युरोपियन दर्जाची वैद्यकीय उपकरणे बसविण्यात आली होती. या रुग्णवाहिका लवकरच महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (MEMS 108) ताफ्यात दाखल होणार आहेत. या दरम्यान दोन गंभीर आपत्कालीन घटनांमध्ये वैद्यकीय पथकाने तातडीने मदत केली. एफसी रोड येथे एका वारकऱ्याची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना घटनास्थळी उपचार देऊन ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले. तसेच दिवे घाट येथे दुसऱ्या एका व्यक्तीला रुग्णवाहिकेमध्ये प्राथमिक उपचार देऊन सासवड ग्रामीण रुग्णालयात हलविण्यात आले.

"आषाढी वारी ही श्रद्धेची यात्रा आहे, पण ती शारीरिकदृष्ट्याही खूप कष्टदायक असते. वारकऱ्यांना चांगल्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे आणि त्यांचा प्रवास सुरक्षित करणे हे आमचे उद्दिष्ट आहे." सुमीत ग्रुप एंटरप्रायझेसचे एक्झिक्युटिव्ह चेअरमन आणि सुमीत एसएसजीचे चेअरमन सुमीत साळुंखे असे यावेळी म्हणाले. ते पुढे म्हणाले की, कंपनी केवळ रुग्णवाहिकांचा ताफा उभारत नसून महाराष्ट्रासाठी आधुनिक आणि मजबूत आपत्कालीन वैद्यकीय सेवा व्यवस्था उभारत आहे.

सुमीत ग्रुप अनेक वर्षांपासून वारीदरम्यान अन्न, स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वच्छता उपक्रम राबवत आहे. सुमीत ग्रुप विषयी - सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस ही भारतातील औद्योगिक सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांपैकी एक असून, देशातील २० हून अधिक राज्यांमध्ये तिचे कार्यक्षेत्र विस्तारलेले आहे. कंपनीकडे ५०,००० हून अधिक कर्मचारी कार्यरत असून, विविध उद्योगांना दर्जेदार व विश्वासार्ह सेवा पुरविण्यात तिचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. सुमीत एसएसजी (Sumeet SSG) हा सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस (भारत) आणि एसएसजी ट्रान्सपोर्टे सॅनिटारियो (स्पेन) यांच्यातील इंडो-स्पॅनिश संयुक्त उपक्रम (Joint Venture) आहे. भारतातील आपत्कालीन वैद्यकीय सेवांची गुणवत्ता आणि कार्यक्षमता जागतिक स्तरावर नेण्याच्या उद्दिष्टाने स्थापन झालेल्या या संस्थेकडे महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा (MEMS) १०८ प्रकल्पाच्या अंमलबजावणीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- ४११ ००१**

दुरध्वनी क्रमांक ०२०/२६१२२४८५ व २६१२२४१४ फॅक्स क्र. ०२०/२६१२२४८५

Web- www.mahapwd.gov.in & e-mail- pune.ee@mahapwd.gov.in

**रिक्वेस्ट फॉर प्रपोझल-ई-निविदा सुचना क्रमांक २० सन २०२६-२०२७**

कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ (दुरध्वनी क्रमांक २६१२२४८५/२६१२२४१४) हे तत्सम अनुभवी तसेच निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करत असलेल्या वास्तुविशारद आणि प्रकल्प व्यवस्थापन सेवा सल्लागार अथवा संस्था यांचेकडून खालील कामांकरीता रिक्वेस्ट फॉर प्रपोझल नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | इसारा/ प्रासेसिंग फी | निविदा संचाची किंमत | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, औंध, पुणे येथे प्रशिक्षणासाठी अत्याधुनिक प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम करणे., या कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नेमणुक करणे. | ८७,०००/- | रू. ५९०/- (Including GST १८ %) ना-परतावा | तत्सम अनुभवी तसेच निविदेमधील दिलेल्या पात्रता पुर्ण करीत असलेल्या प्रकल्प व्यवस्थापन सेवा सल्लागार अथवा संस्था |

ई - निविदेचे वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १. | रिक्वेस्ट फॉर प्रपोझल ई-निविदा उपलब्ध कालावधी/ऑनलाईन विक्री कालावधी | दि. १५/०७/२०२६ वेळ सकाळी १०.०० वा. ते दि. २४/०७/२०२५ वेळ सायंकाळी १८.०० वा. पर्यंत. |
| २. | निविदा पुर्व चर्चा बैठक (Pre-bid Meeting) स्थळ, दिनांक व वेळ | दि. २७/०७/२०२६ रोजी वेळ सकाळी १२.०० वाजता. मा. मुख्य अभियंता, सा. बां. प्रादेशिक विभाग, पुणे, नवीन मध्यवर्ती इमारत आवार, पुणे १ यांचे कार्यालयामध्ये. |
| ३. | रिक्वेस्ट फॉर प्रपोझल ई-निविदा निविदा सादर करावयाचा कालावधी | दि. १५/०७/२०२६ वेळ सकाळी १०.०० वा. ते दि. २४/०७/२०२५ वेळ सायंकाळी १८.०० वा. पर्यंत. |
| ४. | ई निविदा उघडणेचा दिनांक व वेळ. | दि. २७/०७/२०२६ रोजी सकाळी १०.०० वा. (शक्य झाल्यास) मा. अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, पुणे यांचे कार्यालयामध्ये |

टिप :-
खालील संकेतस्थळावर ई-निविदेची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. https://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास त्याबाबतची शुध्दीपत्रके वरील वेबसाईटवरकळविण्यांत येईल.)
3. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे- १ मध्यवर्ती इमारत आवार, पुणे या कार्यालयातील सुचना फलक.

क्रमांक : आरओसी-2026-27/क्र-5/C1687

सही/-
(प्रशांत शं. खैरमोडे) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे ४११ ००१.

# मातंग समाजाला सिंहावलोकन करण्याची गरज - माजी आमदार भालेराव

## पिंपरी चिंचवड येथील सामाजिक न्याय समर्थन परिषदेत एकमुखी मागणी



पिंपरी (दै. संध्या)

स्वतःचे अधिकार मिळवण्यासाठी मातंग समाजाने अनेक वर्षाचा लढा दिला आहे. पहिला लढा शाहीर आण्णाभाऊ साठे महामंडळ प्राप्त करण्यासाठी दिला. दुसरा लढा लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोग प्राप्त करण्यासाठी दिला गेला. आता तिसरा आणि निर्णायक लढा आरक्षण मिळवण्यासाठी द्यायचा आहे. ही एक सामाजिक न्यायाची लढाई आहे. हा लढा देताना खूप संघर्ष करावा लागणार आहे यामध्ये यश मिळवण्यासाठी मातंग समाजाला सिंहावलोकन करण्याची गरज असल्याचे मत सामाजिक न्याय समर्थन परिषदेत मार्गदर्शन करताना माजी आमदार सुधाकर भालेराव यांनी केले.

मातंग सेवा संघ, भारतीय लहुजी पँथर आणि क्रांतिवीर विचारमंच या संस्थेच्या वतीने चिंचवड येथे रविवारी (दि.१२ जुलै) आरक्षण उपवर्गीकरणाच्या पाठिंब्यासाठी पिंपरी चिंचवड शहर मातंग समाजाची "सामाजिक न्याय समर्थन न्याय परिषद" आयोजित करण्यात आली होती.

या परिषदेच्या अध्यक्षस्थानी मातंग सेवा संघाचे अध्यक्ष भाऊसाहेब आडागळे होते. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक व भारतीय लहुजी पँथरचे अध्यक्ष संदीपान झोंबाडे, लहुजी शक्ती सेना प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे आदींनी देखील मार्गदर्शन केले.

इतर समाजातील लोक मातंग समाजाला धार्मिकतेच्या नावाखाली अंधश्रद्धेकडे नेण्याचा प्रयत्न करत आहेत. आपल्या समाजातील प्रगत झालेल्या लोकांनी मागे राहिलेल्या समाजाला पुढे नेण्यास मदत केली पाहिजे. इतर समाजाचे लोक आपण त्यांच्या बरोबरीला येऊ नये म्हणून या वर्गीकरणाला विरोध करण्याचे षडयंत्र करत आहेत. आपल्या समाजात विषमता आहे. पुढे गेलेली व्यक्ती मागच्या व्यक्तीला मदतीचा हात देत नाहीत. लवकरच लहुजी सैनिक दलाची स्थापना केल्याची घोषणा भाऊसाहेब आडागळे यांनी केली. आम्ही इतर समाजाचे आरक्षण मागत नाही. आमचा समाज पुढे जाण्यासाठी उपवर्गीकरणातून स्वतंत्र आरक्षण मिळालेच पाहिजे असे अध्यक्षीय भाषणात भाऊसाहेब आडागळे यांनी सांगितले.

आमच्या हक्काचे सामाजिक न्याय विभागाचे बजेट कुणाच्या पदरात पडले. ज्या समाजाचा मंत्री असेल त्यांनाच लाभ मिळतो. आम्हाला काहीच मिळाले नाही. आमच्या समाजासाठी शाळा नाही, नोकरी नाही, फक्त चतुर्थ श्रेणी ची जागा मिळते, ती पण कमी प्रमाणात. शिफारसी अनेक केल्या पण मंजूर काहीच नाही झाले समाज कल्याण विभागाने आदेश काढला पण जीआर निघाला नाही. दुसऱ्या समाजाचे आमदार त्यांच्या समाजासाठी काम करतात. आता जो लढा चालू आहे त्यामध्ये ६८ शिफारसी आहेत. त्यामध्ये उद्योग, भूखंड, शाळा, महिला, वस्तीगृह या गोष्टींचा समावेश होतो. त्या लागू व्हायला पाहिजेत. ही परिषद बुद्धिवादी लोकांची आहे. आरक्षणाची लढाई प्रभावीपणे लढावी लागेल. जातीसाठी एकत्रित या असे आवाहन संदिपान झोंबाडे यांनी केले. मातंग समाजाचे मतदान दुसऱ्याच्या पारड्यात पडते. आपल्या समाजाचा कार्यकर्ता निवडून येत नाही. आता शांत बसायचे नाही. राजकीय सांस्कृतिक दृष्ट्या समाजाला जागृत व्हावे लागेल, अभ्यास करावा लागेल, एकत्र यावे लागेल, तोपर्यंत समाजात काय चाललंय ते कळणार नाही, वेगवेगळी सरकारे आली पण त्यांनी काय केले, आमचे महामंडळ बंद केले. गेले ६ वर्ष आम्हाला आमचे बजेट मिळाले नाही आता सर्व मागण्या मान्य होईपर्यंत लढायचा निर्धार सर्वांनी केला आहे असे कैलास खंदारे यांनी सांगितले.

परिषदेच्या आयोजनात बापू पाटोळे, सविता आव्हाड, धीरज सकट, सचिन धूनगव, डी. पी. खंडाळे, रामदास कांबळे, सुरेश जोगदंड, नाना कांबळे, महादेव आडागळे, विजय कांबळे, कालिंदा एडके, शांताराम खुडे, लक्ष्मण आडागळे, आदींनी सहभाग घेतला होता. स्वागत अविनाश शिंदे, सूत्रसंचालन विशाल कसबे यांनी केले तर आभार बापू वाघमारे यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### मोशी दुर्घटना : पर्यावरण विभागाचे प्रमुख अभियंता संजय कुलकर्णींचा पदभार काढला

पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने महत्त्वाचा प्रशासकीय निर्णय घेतला आहे. महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी सोमवारी (दि.१३) आदेश काढत पर्यावरण अभियांत्रिकी विभागासह अनेक विभागांचा अतिरिक्त कार्यभार मुख्य अभियंता-१ संजय नारायण कुलकर्णी यांच्याकडून काढून तो मुख्य अभियंता-२ प्रमोद सुधाकर ओंबासे यांच्याकडे सोपविला आहे. महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार, प्रशासकीय कामकाजाच्या सोयीच्या दृष्टीने हा अतिरिक्त कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात बदलण्यात आला आहे. या आदेशाची अंमलबजावणी तत्काळ करण्यात येणार आहे. आयुक्तांच्या आदेशानुसार, मुख्य अभियंता-२ प्रमोद सुधाकर ओंबासे यांच्याकडे पर्यावरण अभियांत्रिकी, जलनिःसारण मुख्य कार्यालय, झोनिपू, स्थापत्य, BSUP आणि PMAY या विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला आहे. कार्यकारी अभियंता (पर्यावरण) सोहन मधुकर निकम यांच्याकडे कार्यकारी अभियंता योगेश आल्हाट यांच्याकडील पर्यावरण विभागाचे कामकाज देण्यात आले आहे. दोन्ही अधिकाऱ्यांनी त्यांच्या मूळ जबाबदाऱ्यांसह हा अतिरिक्त कार्यभार सांभाळायचा आहे.

### पिंपळे सौदागरमधील मेडिकल स्टोअरमध्ये 73 लाखाचा अपहार

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपळे सौदागर येथील एका मेडिकल स्टोअरमध्ये तब्बल ७३ लाख २१ हजार ७९४ रुपयांच्या अपहाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात कर्मचारी दिग्विजयसिंग प्रवीणसिंग राजपूत (रा. संतोष नगर, ताथवडे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. शिववर्धन मोहनलाल अग्रवाल (वय ५१, प्राधिकरण निगडी) यांनी फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून दिग्विजयसिंग राजपूत याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३१६(४), ३१८(४) तसेच इतर संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, आरोपी हा पिंपळे सौदागर येथील लोटस ड्रग स्टोअर या मेडिकल व्यवसायात नोकरी करत होता. सन २०१९ ते जानेवारी २०२६ या कालावधीत त्याने विश्वासाचा गैरफायदा घेत मेडिकलमधील औषध विक्रीची ५२ लाख ५४ हजार ५३२ रूपये रक्कम स्वतःच्या बँक खात्यात वळविली. तसेच रोख विक्रीतील ३३ लाख ६० हजार ७६५ रुपये एवढी रक्कमही स्वतःकडे ठेवून एकूण ७३,२१,७९४ रुपयांचा अपहार केल्याचा आरोप आहे. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर फिर्यादी यांनी सांगवी पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून सहायक पोलीस निरीक्षक पाटील हे पुढील तपास करीत आहेत.

### संघटनात्मक बांधणीसाठी शिवसेनेच्या घोंगडी बैठकांना उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी (दैनिक संध्या) : शिवसेना पक्षाच्या संघटनात्मक बांधणीसाठी शहरभर आयोजित करण्यात आलेल्या 'घोंगडी बैठका' (टप्पा-२) उत्साहपूर्ण वातावरणात आणि यशस्वीरीत्या पार पडत असून, नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार तथा शिवसेना उपनेते श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठका आयोजित करण्यात येत आहेत. पहिली बैठक आकुर्डी येथील दत्तवाडी परिसरात पाटील हॉस्पिटलसमोर पार पडली. या बैठकीस शिवसेनेचे महानगर प्रमुख राजेश फलके, युवासेना जिल्हाप्रमुख सागर पाचारणे, युवासेना शहर प्रमुख चेतन बेंद्रे, युवासेना सहसंपर्क प्रमुख राजीव मेनन, युवासेना शहर प्रमुख श्वेता कापसे, केदार चासकर, योगिता काळे, सुनील कानसकर, दिनेश काशीद, आझाद पठाण, सुभाष चौधरी यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यानंतर दुसरी बैठक पिंपरी येथील मिलिंदनगर परिसरात पार पडली. या बैठकीस राजेश फलके, सागर पाचारणे, चेतन बेंद्रे, युवतीसेना जिल्हाप्रमुख सायली साळवी, राजीव मेनन, श्वेता कापसे, केदार चासकर, अश्विनी जाधव, सुवर्णा तडसरे, आशिष जाधव, सोमनाथ बेंद्रे, रंजना काळे, वर्षा उजागरे, लता गायकवाड, कोमल गायकवाड, ललिता पवार, तुकाराम उजागरे, विमल कुलबुर्गी, सुनीता रणपिसे, शकुंतला सोनवणे, गोपाळ तेलंग, आसिफा शेख, मनीषा गायकवाड, पल्लवी जाधव, सिद्धार्थ गायकवाड, सुरज खरात, निर्मला सरदार, विशाल गायकवाड, सॅमसन काळे, सोनू सोनवणे, संगीता कडू, अमीना शेख, कशीमा पठाण, रफिक शेख, लोचना यादव आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीदरम्यान नागरिकांनी परिसरातील विविध समस्या, अडीअडचणी तसेच विकासकामांबाबतच्या मागण्या मांडल्या. स्थानिक पातळीवरील प्रलंबित कामे, विकासकामांची सद्यस्थिती आणि नागरिकांच्या अपेक्षांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

# औद्योगिक क्रीडा संघटनेची सर्वसाधारण सभा व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न



पिंपरी (दै. संध्या)

औद्योगिक क्रीडा संघटनेची सर्वसाधारण सभा व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच ढोले पाटील रोड येथील कपिला बिझनेस हॉटेल येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास पिंपरी-चिंचवड, चाकण, तळेगाव आणि पुणे परिसरातील विविध औद्योगिक कंपन्यांचे खेळाडू, प्रतिनिधी तसेच क्रीडा क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता शेळके यांनी केले. संघटनेचे पदाधिकारी प्रदीप वाघ यांनी प्रास्ताविक करत मागील वर्षाचा आढावा व आर्थिक अहवाल सादर केला. प्रमुख पाहुणे ॲम्युनेशन फॅक्टरीचे ॲडिशनल जनरल मॅनेजर अनुपकुमार यांचा संघटनेचे अध्यक्ष व आंतरराष्ट्रीय गोल्फपटू राजेंद्र नागेशकर, उपाध्यक्ष नरेंद्र कदम आणि सचिव वसंत ठोंबरे यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

२०२५-२६ या वर्षातील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये टाटा मोटर्सने ३१ गुणांसह सर्वसाधारण विजेतेपद, तर बजाज ऑटो आकुर्डीने २७ गुणांसह उपविजेतेपद पटकावले. टाटा मोटर्सतर्फे स्पोर्ट्स कमिटीचे अध्यक्ष शशिकांत कात्रे व एचआर-स्पोर्ट्स मॅनेजर नितीन कदम यांनी विजेतेपदाचा करंडक स्वीकारला. तर बजाज ऑटोचे एचआर व स्पोर्ट्स मॅनेजर अतुल काळोखे यांनी उपविजेतेपदाचा करंडक स्वीकारला. यावेळी संघटनेचे २०२६-२७ चे क्रीडा वेळापत्रक देखील जाहीर करण्यात आले.

सत्काराला उत्तर देताना अनुपकुमार यांनी सांगितले की, "खेळामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि ऊर्जा वाढते. त्यामुळे प्रत्येकाने नियमितपणे खेळात सहभागी व्हावे. ६२ वर्षांची औद्योगिक क्रीडा संघटना कामगार क्षेत्रातील खेळाडूंना आपले कौशल्य सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे, ही अभिमानास्पद बाब आहे."

संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र नागेशकर यांनी सांगितले की, २०२५-२६ मध्ये संघटनेच्या १४ स्पर्धांमध्ये सुमारे २५० कंपन्या आणि २,५०० हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला. तसेच यंदा प्रथमच महिला क्रिकेट आणि पासिंग व्हॉलीबॉल या स्पर्धांचा समावेश करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली.

यावेळी विविध स्पर्धांना प्रायोजकत्व देणाऱ्या कंपन्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विजय हिंगे, हरी देशपांडे, प्रदीप वाघ, दुष्यंत गायकवाड, संतोष शिंदे, अशोक त्यागी, दयानंद प्रक्षाले, अतुल काळोखे, सचिन कांबळे, गिरीश गायकवाड, मंदार कुलकर्णी, अनिकेत आवटे, राहुल चावरिया, कृष्णा कोले, मिनीनो कार्डोझ आणि वल्लभ मेंगाळे यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी वसंत ठोंबरे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापतीपदाची निवडणूक बिनविरोध!




पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आज महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली.

महापालिकेच्या प्रभाग समिती सभापती पदासाठी प्रत्येक प्रभागातून एकच उमेदवाराचा अर्ज प्राप्त झाल्याने सर्व प्रभाग समिती सभापती पदांची निवडणूक बिनविरोध पार पडली. या निवडणूक प्रक्रियेमध्ये विभागीय आयुक्त यांच्या आदेशानुसार पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (भा.प्र.से.) प्रजित नायर यांनी पीठासीन अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

या निवडणूक प्रक्रियेचे नगरसचिव उल्हास जगताप, मुकेश कोळप,विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रभाग अधिकारी निवेदिता घार्गे,गोरक्षनाथ लिमण, अजिंक्य येळे, अश्विनी गायकवाड, परशुराम वाघमोडे, अतुल पाटील, पूजा दूधनाळे, डी.डी.कांबळे,संतोष कोराड तसेच नगरसचिव विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी काम पाहिले तर निवडणूक प्रक्रियेचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले. पीठासीन अधिकारी प्रजित नायर यांनी आज जाहीर केलेल्या निर्णयानुसार, 'अ' राजगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना करांडे, 'ब' सिंहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी मंदार देशपांडे, 'क' विजयदुर्ग प्रभाग समितीच्या सभापतीपदी निखिल बोऱ्हाडे, 'ड' देवगिरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी सविता खुळे, तर 'इ' शिवनेरी प्रभाग समितीच्या सभापतीपदी अर्चना सस्ते यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे 'फ' तोरणा प्रभाग समितीच्या सभापतीपदी शिवानी नरळे, 'ग' पुरंदर प्रभाग समितीच्या सभापतीपदी मनिषा पवार, 'ह' प्रतापगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी तृप्ती कांबळे, 'ज' रायगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी आरती चोंधे आणि 'ल' लोहगड प्रभाग समितीच्या सभापतीपदी रेखा देवकर यांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

प्रभाग सभापती पदाची निवडणूक पूर्ण संपल्यानंतर प्रभाग समिती सभापतींनी महापौर रवी लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर यांच्यासह पदाधिकारी, नगरसदस्य, नगरसदस्यांची भेट घेतली.

## अतिवृष्टीने मावळ होरपळला; शेतकऱ्यांच्या मदतीसाठी धावले आमदार सुनील शेळके

मावळ (दै. संध्या)

मावळ तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण तालुक्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. विशेषतः आंदर मावळ भागात अतिवृष्टीमुळे शेती, रस्ते आणि सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार सुनील शेळके यांनी नुकसानग्रस्त भागांना प्रत्यक्ष भेट देत परिस्थितीची सविस्तर पाहणी केली आणि प्रशासनाला तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत देण्याचे स्पष्ट निर्देश दिले. सततच्या पावसामुळे नदी-नाले दुथडी भरून वाहू लागल्याने अनेक ठिकाणी शेती वाहून गेली, भातशेतीचे मोठे नुकसान झाले, तर काही भागांत दरडी कोसळून रस्त्यांचीही दुरवस्था झाली आहे. भात उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या मावळ तालुक्यात यंदाचा पाऊस शेतकऱ्यांसाठी मोठे संकट ठरल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने केलेली लागवड आणि मशागतीचे काम पावसामुळे उद्ध्वस्त झाले आहे. आमदार सुनील शेळके यांनी आंदर मावळातील विविध गावांमध्ये जाऊन शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. प्रत्येक ठिकाणी नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करत अधिकाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा विलंब न करता पंचनामे पूर्ण करण्याचे आदेश दिले. शासनाकडून योग्य ती आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही त्यांनी शेतकऱ्यांना दिली.

यापूर्वीही पाटण परिसरात दरड कोसळून जीवितहानी झालेल्या ठिकाणी तसेच लोणावळ्यातील पूरग्रस्त भागात जाऊन त्यांनी परिस्थितीची पाहणी केली होती.

# भारताच्या प्रगतीसाठी संशोधनावर लक्ष - पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील



पिंपरी (दै. संध्या)

भारताच्या औद्योगिक, आर्थिक प्रगतीसाठी नवोपक्रम व संशोधनावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आगामी काळात पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) हे स्टार्टअप केंद्रित विद्यापीठ म्हणून विकसित करण्यात येईल. तसेच हरित ऊर्जा, हवामान बदल, शाश्वत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रात संशोधन करून आव्हानांचे संधी मध्ये रूपांतर करून स्टार्टअपला चालना दिली जाईल. तसेच भारत - जपान सहकार्य माध्यमातून विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार होण्यास मदत होईल असे प्रतिपादन पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठात (पीसीयू) येथे 'आंतरराष्ट्रीय मास्टरमाइंड मीट (आयएम ३)–२०२६' च्या उद्घाटन प्रसंगी हर्षवर्धन पाटील बोलत होते. विकसित भारत २०४७ या संकल्पनेला संशोधन आणि नव उपक्रम या माध्यमातून गती देण्यासाठी आयोजित परिषदेत कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, संशोधन व विकास संचालक तसेच डॉ. भरत काळे, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक डॉ. राजेंद्र जगदाळे, मायक्रोलिन (अमेरिका) चे संस्थापक डॉ. अशोक जोशी आणि युनिव्हर्सिटी ऑफ न्यूकॅसल, ऑस्ट्रेलिया येथील ग्लोबल इनोव्हेटिव्ह सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड नॅनोमटेरियल्सचे संचालक प्रा. अजयन विनू , मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल, सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई, भारतीय विज्ञान संस्था, बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार, टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड इनोव्हेशन डॉ. रिचर्ड लोबो, सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे, दक्षिण आफ्रिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ व्हेंडा येथील डॉ. फुलुफ्हेलो नेमांगवेले, भारतीय विज्ञान संस्थेचे डॉ. सचिन रोंडिया आदींसह देश विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी आणि धोरणकर्ते या परिषदेत सहभागी झाले होते. यावेळी ॲबस्ट्रॅक्ट स्मरणिका प्रकाशित करण्यात आली.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी विद्यापीठातील संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेला चालना देण्यासाठी उभारण्यात आलेल्या सक्षम परिसंस्थेची माहिती देत विद्यार्थी आणि संशोधकांनी समाजोपयोगी संशोधन करण्याचे आवाहन केले.

प्रा. अजयन विनू यांनी कार्बन उत्सर्जन, हरित ऊर्जा, हायड्रोजन इंधन, स्वच्छ ऊर्जा आणि प्रगत नॅनोमटेरियल्स या विषयांवर मार्गदर्शन केले.

तांत्रिक सत्रांमध्ये डॉ. अशोक जोशी यांनी ज्ञानाचे आर्थिक मूल्यात रूपांतर करणारी प्रक्रिया म्हणजे नवोपक्रम असून, तो देशाच्या अर्थव्यवस्था वाढीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. सेंट्रल इलेक्ट्रोकेमिकल रिसर्च इन्स्टिट्यूटचे संचालक प्रा. विजय मोहनन पिल्लई यांनी ऊर्जा साठवणूक, द्विमितीय पदार्थ, इलेक्ट्रोकॅटलिसिस, लिथियम-आयन बॅटरी, बॅटरी कचरा आणि स्वच्छ ऊर्जेतील आव्हाने यावर मार्गदर्शन केले.

प्रा. अजयन विनू यांनी प्रगत सच्छिद्र कार्बन आधारित पदार्थ, हायड्रोजन निर्मिती, कार्बन डायऑक्साइड नियंत्रण आणि पर्यावरणपूरक ऊर्जा उपाय यावरील संशोधन सादर केले.

भारतीय विज्ञान संस्था, बेंगळुरू येथील प्रा. पी. एस. अनिल कुमार यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने क्वांटम पदार्थांचे अभियांत्रिकीतील संशोधन, मशीन लर्निंगचा वापर आणि आधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी आवश्यक प्रगत पदार्थ विकास याविषयी माहिती दिली.

टाटा केमिकल्सचे ग्लोबल हेड, इनोव्हेशन डॉ. रिचर्ड लोबो यांनी जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता, संशोधनातील नवे प्रवाह आणि २०३५ पर्यंतच्या तांत्रिक परिवर्तनाची माहिती दिली.

मिड स्वीडन विद्यापीठाचे डॉ. कौस्तुभ दलाल यांनी आरोग्य सेवेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या गुंतवणुकीचे आर्थिक मूल्यांकन, त्यातील आव्हाने आणि संधी स्पष्ट केल्या.

सी-डॅकचे डॉ. कृष्णांजन भट्टाचार्य यांनी भाषा मॉडेल्स मधील डेटा करप्शन आणि त्यावरील उपाय याची माहिती दिली.

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. विलास खरचे यांनी अचूक शेती, पीक निरीक्षण, हवामान बदलाशी सुसंगत शेती, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि स्मार्ट कृषी तंत्रज्ञान वापर याचे मार्गदर्शन केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे बारामती तालुक्यात प्रशासनाच्यावतीने स्वागत

बारामती (दैनिक संध्या) : 'हीच व्हावी माझी आस, जन्मोजन्मी तुझा दास, पंढरीचा वारकरी, वारी चुको न दे हरी ' या भावनेसह, टाळ-मृदंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा- माऊली तुकाराम'....रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी... अशा जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज बारामती तालुक्यात आगमन झाले. मौजे खराडेवाडी येथे प्रशासनाच्यावतीने उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी पालखी रथ आणि दिंड्यांचे दर्शन घेऊन स्वागत केले. यावेळी पंचायत समितीचे सभापती किरण तावरे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे खाजगी सचिव सचिन यादव, बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, दौंडचे बापूराव तडस, बारामतीचे तहसीलदार स्वप्नील रावडे, दौंडचे तहसीलदार अरुण शेलार, बारामतीचे गट विकास अधिकारी किशारे माने, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते. बारामती तालुक्यात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम उंडवडी गवळ्याची व बारामती शहरात शारदा प्रांगण या ठिकाणी आहे. आषाढी वारीकरीता येणाऱ्या वारकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तालुका प्रशासन, बारामती नगरपरिषद, पंचायत समिती, पोलीस विभाग, आरोग्य विभागाच्यावतीने तयारी केली आहे. जर्मन हँगर पद्धतीचे मंडप, पिण्याचे पाणी, वीज, फिरते वैद्यकीय पथके, मोफत औषधोपचार, चरणसेवा, हिरकणी कक्ष, निवारा केंद्र, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, फिरते सुलभ शौचालय, कचरा वाहतूक घंटागाडी, कचरा कुंडी, पोलीस मदत केंद्र, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका, सूचना फलक आदी व्यवस्था करण्यात आली असून ध्वनीक्षेपकाद्वारे सूचनाही देण्यात येत आहेत.

### ग्रामपंचायतीची शुक्रवारी विशेष ग्रामसभा

चाकण(दैनिकसंध्या):राज्यातील सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या व सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या नवनिर्मिती ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमाबाबत ग्रामस्थांची संवाद साधण्याकरता खालुंब्रे ग्रामपंचायतीच्या वतीने खालुंब्रे (ता. खेड) येथे शुक्रवारी (दि.१७) विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आली आहे. करंजविहीरेचे मंडलाधिकारी राजेंद्र वडणे यांच्या अध्यक्षतेखाली खालुंब्रे ग्रामपंचायतीच्या सभागृहात शुक्रवारी सकाळी ११ वाजता या ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रामसभेचे ग्रामपंचायतीच्या वतीने जोरदार नियोजन करण्यात आले असून, येथील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने या ग्रामसभेला उपस्थित राहण्याचे आवाहन ग्रामपंचायत अधिकारी श्रीधर नाईकडे व प्रशासक एस.एस.साळुंके यांनी केले आहे.

### जेजुरीतून एसटी बस बंद ठेवल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित

जेजुरी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने पुरंदर तालुक्यातही एसटी बस सेवा बंद होती. दिनांक 14 रोजी पहाटे पालखी सोहळा वाल्हे कडे मार्गस्थ झाला. मात्र एसटी सेवा बंद असल्याने सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना सासवड अगर पुणे कडे महाविद्यालयात , शाळेत जाता आले नाही. त्यांचे शैक्षणिक नुकसान झाले असल्याचे सामाजिक कार्यकर्ते उदयसिंह भैया काळे यांनी सांगितले. जेजुरी व परिसरातून असंख्य विद्यार्थी महाविद्यायीन व शालेय शिक्षणासाठी दररोज जेजुरीतून सासवड व पुणे येथे जात असतात. दिनांक 11,12 रोजी सासवड तर 13 रोजी जेजुरी येथे पालखी सोहळा मुक्कामी होता. दिनांक 14 रोजी पहाटे हा पालखी सोहळा वाल्हे कडे मार्गस्थ झाला. सकाळी 7 ते 10 वाजे पर्यंत सासवड एसटी आगारातून जेजुरी तून एकही बस सोडण्यात आली नाही. त्यामुळे सुमारे दीडशे विद्यार्थ्यांना विद्यालयात जाता आले नाही त्याचे शिक्षण नुकसान झाले. बस का सोडण्यात आली नाही याची चौकशी करून संबंधितावर कारवाई करावी अशी मागणी विभाग नियंत्रण पुणे कार्यालयात उदयसिंह काळे यांनी केली आहे.

### गराडेत गोठ्यातून 18 जनावरांची चोरी

सासवड (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील गराडे येथील ढोणे वस्तीवर अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री गोठ्यात डल्ला मारत तब्बल १८ दुभती जनावरे चोरून नेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून, जनावरांची एकूण किंमत १७ लाख १० हजार रुपये इतकी आहे. फिर्यादी संतोष बापूसाहेब कटके (वय ३२, रा. भिवरी) यांचा शेती व दुध व्यवसाय आहे. १३ जुलै रोजी रात्री १० वाजता नेहमीप्रमाणे गोठ्यातील कामे आटोपून ते घरी गेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी ते दर्शनासाठी बाहेरगावी असताना, त्यांना महेंद्र जगदाळे यांचा फोन आला. पहाटे ५ वाजता गोठ्यावर गेले असता, १२ पैकी ९ म्हशी आणि ९ गाई जागेवर नसल्याचे त्यांना आढळले. कटके यांनी परिसरात शोध घेतला, मात्र जनावरे मिळून आली नाहीत. अज्ञात चोरट्यांनी गोठ्यातून १७ लाख १० हजार रुपये किमतीची जनावरे पळवून नेल्याची खात्री पटल्यानंतर संतोष कटके यांनी सासवड पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली. चोरीस गेलेल्या जनावरांचा तपशील: मुऱ्हा जातीच्या ७ म्हशी: ७ लाख ७० हजार रुपये. जाफराबादी जातीच्या २ म्हशी: २ लाख २० हजार रुपये. एच.एफ. व जर्सी जातीच्या ९ गाई: ७ लाख २० हजार रुपये. एकूण: १७ लाख १० हजार रुपये. याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे करत आहेत. एकाच रात्रीत मोठ्या प्रमाणात जनावरे चोरीला गेल्याने स्थानिक शेतकरी आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पालखीतील असाक्षरांना दिले साक्षरतेचे धडे

## साक्षरतेची ही वारी जेजुरीत

**जेजुरी (दै. संध्या)**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या निमित्ताने जेजुरीत दाखल झालेल्या वारकऱ्यांमध्ये "साक्षरतेची ही वारी" हा अभिनव उपक्रम उत्साहात राबविण्यात आला. उल्लास – नवभारत साक्षरता अभियान अंतर्गत पालखीतील असाक्षर व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना साक्षरतेचे प्राथमिक धडे देण्यात आले.

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण संचालक कृष्णकुमार पाटील, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव ,राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर तसेच पुरंदर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे यांच्या मार्गदर्शनानुसार हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी भाऊसाहेब सरक,राज साबळे, अनंता पोकळे, दिपक भुजबळ,संभाजी देशमुख,जिजामाता प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे, पर्यवेक्षक बाळासाहेब जगताप, माध्यमिक विभागप्रमुख प्रल्हाद गिरमे, ज्युनिअर विभागप्रमुख किरण



मोडक, सोमनाथ उबाळे, उल्लास – नवभारत साक्षरता अभियान प्रमुख कुलदीप साळवे, राघू हारुळे, महेश खाडे,मयुर शिंदे,विद्या म्हेत्रे,कोमल कुदळे, मोनिका झगडे, फरांदे मॅडम,ज्योती जाधव, स्वाती बारभाई, कैलास भोसले, धोंडीराम पवार, रसिका भुजबळ यांनी पालखीतील असाक्षर व्यक्तींशी संवाद साधून त्यांना अक्षरओळख, वाचन-लेखनाचे प्राथमिक धडे दिले. शिक्षणाचे महत्त्व, साक्षरतेचे फायदे आणि निरक्षरता दूर करण्याची गरज याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी जिजामाता शैक्षणिक संकुलाच्या विद्यार्थ्यांनी "वारी साक्षरतेची" हे प्रभावी पथनाट्य सादर केले.

या पथनाट्याचे विभागप्रमुख शिल्पा पाटोळे असून गणेश मगर, छाया साबळे, अमृता कांबळे, पौर्णिमा धुमाळ, सुनीता शिंदे व सुनंदा भोंगळे यांनी या पथनाट्याच्या सादरीकरणात सक्रिय सहभाग घेतला. पथनाट्यातून शिक्षणाचे महत्त्व, निरक्षरतेमुळे होणारे दुष्परिणाम आणि प्रत्येक नागरिकाने साक्षर होण्याची आवश्यकता प्रभावीपणे मांडण्यात आली. विद्यार्थ्यांच्या दमदार अभिनयाला उपस्थित वारकरी व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

"जन-जन साक्षर, शिकाल तर टिकाल" हा संदेश वारकऱ्यांपर्यंत पोहोचवत साक्षरतेचा प्रसार करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञान, समता आणि समाजप्रबोधनाच्या विचारांना साक्षरतेची जोड देणारा हा उपक्रम उपस्थित वारकरी, नागरिक आणि शिक्षणप्रेमींकडून विशेष कौतुकास पात्र ठरला.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पूर्ण



**बारामती (दै. संध्या)**

जेजुरी परिसरात संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात झालेल्या दुर्दैवी अपघातात मृत्युमुखी पडलेल्या तीन वारकरी भगिनींच्या कुटुंबीयांना दिलासा देण्यासाठी शिवसेना आणि डॉ. श्रीकांतदादा शिंदे फाउंडेशनने मदतीचा हात पुढे केला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेला शब्द पाळत मृत वारकरी भगिनींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दोन लाख रुपयांची आर्थिक मदत त्यांच्या मूळ गावी जाऊन सुपूर्द करण्यात आली.

या अपघातात जखमी झालेल्या वारकरी बांधवांनाही तातडीने आर्थिक सहाय्य करण्यात आले आहे. शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेनेचे प्रदेशाध्यक्ष ह.भ.प. अक्षयमहाराज भोसले यांच्या माध्यमातून गंभीर जखमी वारकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपये, तर किरकोळ जखमी वारकऱ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपयांची मदत देण्यात आली. तसेच पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या जखमी वारकरी बांधवांची भेट घेऊन त्यांनाही आर्थिक मदत सुपूर्द करण्यात आली.

## संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात 'संवाद वारी' प्रदर्शन

### नागरिकांना प्रदर्शनाचा लाभ घेण्याचे आवाहन

**बारामती (दै. संध्या)**

श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी राज्य शासनाच्या विविध विभागांच्या ठळक लोककल्याणकारी योजना, उपक्रमांची माहिती देणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मार्फत आयोजित 'संवाद वारी'या चित्र प्रदर्शनाचे, एलईडी व्हॅन, कलापथक व्हॅन तसेच चित्ररथ असून तालुक्यात आज उंडवडी गवळ्याची पालखीतळ आणि बारामती शहरात नगर परिषद परिसरात १५ जुलै रोजी असणार आहे.

श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हे प्रदर्शन मांडणी करण्यात येत असून मुक्काम तळांसोबत संपूर्ण मार्गावर चित्ररथ, कलापथक तसेच एलइडी व्हॅनच्या माध्यमातून शासकीय योजनांची जनजागृती करणार आहेत.

प्रदर्शनात ३० फ्लेक्स पॅनेलचा समावेश आहे. या उपक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण, कौशल्य विकास व गुंतवणूक, महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) धोरण, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, नवीन शैक्षणिक धोरण २०२०, कृषी विभागाचे डिजिटल उपक्रम, जलयुक्त शिवार, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार; महात्मा फुले जनआरोग्य योजना, कामगार कल्याण योजना, प्रधानमंत्री किसान




सन्मान निधी, प्रधानमंत्री पीक विमा योजना (सुधारित), नमो शेतकरी महासन्मान निधी, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, मागेल त्याला शेततळे, लेक लाडकी योजना, पीएम यशस्वी शिष्यवृत्ती योजना, आश्रम शाळा सुविधा, हरित ऊर्जा, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, महाराष्ट्र गृहनिर्माण योजना, दिव्यांग धोरण, शाश्वत जलसंपदा व्यवस्थापन व विकास, आपत्ती व्यवस्थापन, महाराष्ट्र रोजगार हमी योजना आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ तसेच पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहेत.

नागरिकांनी या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने करण्यात येत आहे.

## कोथिंबीरीस शेकडा तीन हजार असा उच्चांकी दर

**बारामती (दै. संध्या)**

बारामती जळोची उपबाजार येथील फळे व भाजीपाला मार्केट मध्ये सोमवार दि. १३ जुलै रोजी आडतदार अभिजित जगताप यांचे आडतीवर मुढाळे गावाचे शेतकरी श्रीकांत गवळी यांचे कोथिंबिरला ३००० रूपये शेकडा असा उच्चांकी दर मिळाला.श्री.गवळी यांना आतापर्यन्त बारामती व इतर मार्केट मध्ये कोथिंबीर विक्रीतुन जवळपास २० लाख रूपये मिळाले. कोथिंबिरीस चांगला भाव मिळत असल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण आहे.शेतक-यांनी बाजार आवारात फळे व भाजीपाला विक्रीस आणताना स्वच्छ व ग्रेडींग करून विक्रीस आणावा व आपला शेतमाल बाजार आवारात विक्री करावा असे आहवान सभापती विनायक गावडे व उपसभापती



अरूण सकट यांनी केले आहे.

कोथिंबीरीस रेन पाईप द्वारे शेततळ्यातुन पाण्याचे व खताचे योग्य नियोजन व वर्षभर सिझन प्रमाणे वेळेवर पेरणी व काढणी करीत असल्याने आणि गेली सात वर्षापासुन टप्याटप्याने पट्टा पद्धतीने लागवड करीत असल्याने चांगला दर मिळत आहे.तसेच बारामती मार्केटने पुरविलेल्या सुविधा,आडत्यांचे सहकार्य व वेळेत शेतकरी पट्टी, अचुक वजन आणि खरेदीदार मधील स्पर्धा तसेच स्थानिक व बाहेरील खरेदीदारांकडुन वाढती मागणी यामुळे चांगला दर मिळाला आहे असे शेतकरी गवळी यांनी सांगितले.

बारामती मार्केट कमिटी मार्फत शेतकरी व व्यापा-यांसाठी यापुढे विविध सुविधा पुरविल्या जातील. अधिक माहितीसाठी बारामती मार्केट कमिटीने तयार केलेल्या बारामती एपीएमसी ॲप चा वापर करावा असे प्रभारी सचिव हौसेराव कोकरे यांनी सांगितले.

जळोची मार्केट मध्ये शेतकरी श्रीकांत गवळी यांचा सत्कार करणेत आला. बाजार समितीचे अधिकारी सुर्यकांत मोरे, दिपक जगताप,परवेज बागवान,संदीप झणझणे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी फळे व भाजीपाला आडतदार संघटनेचे अध्यक्ष सईद बागवान,प्रदीप गदादे, किरण खोचरे,गणेश सस्ते,प्रणय रसाळ व इतर शेतकरी उपस्थित होते.

## गरजू विद्यार्थ्यांना नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्याकडून शालेय पोशाख व साहित्याचे वाटप

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

सामाजिक बांधिलकी जपत राजगुरुनगर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी आश्रमशाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय पोशाख तसेच आवश्यक शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.मांजरेवाडी येथील कै. वसंतराव मांजरे विद्यालयात आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वितरण करण्यात आले. यावेळी समाजसेवक रवी आवटे, अमित धारिवाल, मुख्याध्यापक विष्णू मेदगे, उपशिक्षक संध्या मांजरे, दिलीप मांजरे आणि विश्वास मांजरे उपस्थित होते. दावडी येथील आनंद आश्रमशाळेतील १९ गरीब व गरजू विद्यार्थी सध्या मांजरेवाडी येथील कै. वसंतराव मांजरे विद्यालयात




शिक्षण घेत आहेत. विविध भागांतून आलेल्या या विद्यार्थ्यांना संस्थेकडून मोफत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांना शालेय पोशाख व शैक्षणिक साहित्याची आवश्यकता असल्याचे लक्षात घेऊन नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांनी पुढाकार घेत त्यांना शालेय पोशाख व आवश्यक साहित्याचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून उपस्थितांनी नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले.

## राजगुरुनगर नगरपरिषदेकडून नालेसफाईची कामे युद्ध पातळीवर सुरू, नागरिकांच्या तक्रारीनंतर प्रशासनाची तातडीने कारवाई

**राजगुरुनगर (दै. संध्या)**

राजगुरुनगर नगर परिषदेकडून शहरातील नालेसफाईची कामे युद्धपातळीवर हाती घेण्यात आली असून, विविध ठिकाणी जलप्रवाहातील अडथळे दूर करण्यात आले आहेत. नगरपरिषदेने तातडीने सुरू केलेल्या या नालेसफाई मोहिमेबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील सखल भागात मोठ्या प्रमाणावर पाणी साचून जनजीवन विस्कळीत झाले होते. जलनिस्सारण व्यवस्थेतील त्रुटींमुळे अनेक घरे व दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. शहरातील मुख्य रस्त्यालगत असलेल्या प्राचीन हौद ओढ्यात जलप्रवाहाला अडथळे निर्माण झाल्याने पूरस्थिती निर्माण झाली होती. पुलावरून पाणी वाहू लागल्याने लगतच्या अनेक दुकानांमध्ये पाणी शिरून व्यापाऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले होते.

**दखल दै. संध्याची**


**या समस्येबाबत दैनिक संध्याने "नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे, प्रशासनाचे दुर्लक्ष"** या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करून ओढ्यातील समस्या अधोरेखित केली होती. या वृत्ताची दखल घेत राजगुरुनगर नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ यांच्या सूचनेनुसार स्वच्छता व आरोग्य सभापती सुप्रिया राहुल पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषदेचा आरोग्य विभागाकडून शहरातील नालेसफाई मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेअंतर्गत शहरातील हौद ओढा तसेच केदारेश्वर बंधारा परिसरात वाहून आलेला राडारोडा, गाळ, झुडपे आणि इतर अडथळे हटविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. त्यामुळे पावसाच्या पाण्याचा नैसर्गिक प्रवाह सुरळीत होण्यास मदत होणार असून, भविष्यात पूरस्थिती निर्माण होण्याचा धोका कमी होईल, असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला आहे. मनुष्याच्या हस्तक्षेपामुळे तालुक्यातील अनेक भागात नैसर्गिक जलप्रवाहांमध्ये अडथळे निर्माण होत असल्याने पावसाळ्यात सखल भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत आहे.नुकतेच झालेल्या पावसामुळे पुणे नाशिक महामार्गावरील वाकी परिसरातील सखल भागात पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचून काही काळ वाहतूक बंद ठेवण्यात आली होती.

# बारामती रेल्वे स्थानकाला आधुनिकतेची नवी ओळख!

भारतीय रेल्वेच्या 'अमृत भारत स्टेशन योजने'अंतर्गत साकारलेलं हे आधुनिक, सर्वसमावेशक आणि प्रवासी-स्नेही रेल्वे स्थानक बारामतीच्या आर्थिक,कृषी, औद्योगिक आणि सामाजिक प्रगतीला अधिक बळ देणारं ठरेल, तसंच सुरक्षित,सुलभ आणि दर्जेदार रेल्वे प्रवासाचा नवा अनुभव नागरिकांना देईल,असा विश्वास आहे.

**अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत ₹११.४० कोटींच्या खर्चातून बारामती रेल्वे स्थानकाचा आधुनिक, प्रवासी-स्नेही आणि जागतिक दर्जाच्या सुविधांनी युक्त असा कायापालट करण्यात आला असून हे अद्ययावत स्थानक लवकरच राष्ट्राला समर्पित करण्यात येणार आहे.**





बारामतीच्या या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी आदरणीय अजितदादांनी उपमुख्यमंत्री म्हणून केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाकडे सातत्यानं पाठपुरावा करून हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मोलाचं योगदान दिलं.त्याचबरोबर माझ्या खासदारकीच्या कालावधीतही या प्रकल्पासाठी सातत्यानं पाठपुरावा करण्यात आला.या संयुक्त प्रयत्नांना यश मिळाल्याचा आनंद आहे.या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदीजी आणि रेल्वेमंत्री मा.श्री.अश्विनी वैष्णवजी यांचे मनःपूर्वक आभार मानते. १९१४ पासूनचा इतिहास असलेल्या या स्थानकाचं ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यानंतर आता झालेलं हे अत्याधुनिक आधुनिकीकरण बारामतीच्या विकासाला नवी गती देणारं ठरेल.दररोज सुमारे १,८०० प्रवाशांची सेवा देणाऱ्या या स्थानकावर आधुनिक प्रतीक्षा कक्ष, व्हीआयपी लाउंज,दिव्यांग-अनुकूल सुविधा,सुधारित प्लॅटफॉर्म, आधुनिक प्रकाशयोजना,पिण्याच्या पाण्याच्या सुविधा,नव्यानं विकसित पार्किंग,आकर्षक प्रवेशद्वार आणि स्थानिक संस्कृतीची झलक जपणारी स्थापत्य रचना अशा अनेक आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. बारामती हे राज्यातील महत्त्वाचं कृषी,शैक्षणिक आणि औद्योगिक केंद्र असल्यामुळं या पुनर्विकसित रेल्वे स्थानकामुळं स्थानिक व्यापार, उद्योग,दळणवळण आणि पर्यटनाला मोठी चालना मिळेल.भिगवण पक्षी अभयारण्य,श्री सिद्धेश्वर मंदिर, बारामती कृषी पर्यटन केंद्र आणि कऱ्हा नदी परिसर यांसारख्या पर्यटनस्थळांपर्यंत पोहोच अधिक सुलभ होणार आहे.

स्थानकाच्या पुनर्विकासामध्ये मुख्य स्थानक इमारतीचं सौंदर्यीकरण, परिसर विकास,प्रवेशद्वार व कंपाऊंड भिंतींचं आधुनिकीकरण,स्वच्छता सुविधांचा विस्तार, प्रमाणित नामफलक,प्रवाशांच्या सुरळीत हालचालींसाठी सुधारित व्यवस्था तसंच स्थानकापर्यंत सहज पोहोचता यावं यासाठी आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात आली आहे. मुख्य रस्ते आणि राज्य महामार्गांशी असलेली सुलभ जोडणी,तसंच ऑटो-रिक्षा व इतर स्थानिक वाहतूक सेवांमुळं प्रवाशांच्या शेवटच्या टप्प्यापर्यंतचा प्रवासही अधिक सोयीचा होणार आहे.





दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

## थोडक्यात पण महत्वाचे

### पंतप्रधान आणि रेल्वेमंत्र्यांचे आभार

मुंबई (दैनिक संध्या) : अमृत भारत स्टेशन योजनेअंतर्गत बारामती रेल्वे स्थानकाचा ११.४० कोटी रुपये खर्चून जागतिक दर्जाचा पुनर्विकास करण्यात आल्याबद्दल उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे विशेष आभार मानले आहेत. हे अद्ययावत स्थानक लवकरच राष्ट्राला समर्पित केले जाणार आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी खासदार असताना आणि दिवंगत अजित पवार हे उपमुख्यमंत्री असताना त्यांनी सातत्याने केंद्र सरकार व रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या या संयुक्त प्रयत्नांना यश आले असून बारामतीकरांचे आधुनिक रेल्वे स्थानकाचे स्वप्न आता पूर्ण झाले आहे. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, १९१४ पासूनचा इतिहास असलेल्या या स्थानकाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर झाल्यानंतर आता झालेले हे आधुनिकीकरण बारामतीच्या प्रगतीला नवी गती देईल. रोज अंदाजे १,८०० प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या या स्थानकावर आता दिव्यांग-अनुकूल सुविधा, आधुनिक प्रतीक्षा कक्ष, पार्किंग आणि सुंदर प्रादेशिक स्थापत्य शैलीचा मिलाफ पाहायला मिळत आहे. बारामती हे राज्याचे प्रमुख कृषी, शैक्षणिक व औद्योगिक केंद्र असल्याने या जागतिक दर्जाच्या सुविधांमुळे स्थानिक व्यापार, दळणवळण आणि पर्यटन स्थळांना मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### संजय काटकर यांची विशेष मुलाखत

मुंबई (दैनिक संध्या) : माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित ‘जय महाराष्ट्र‘ आणि ‘दिलखुलास‘ कार्यक्रमातून ‘भक्ती विठोबाची... सेवा आरोग्याची – आषाढी वारीसाठी सार्वजनिक आरोग्य विभागाची व्यापक आरोग्य सज्जता’ या विषयावर सार्वजनिक आरोग्य विभागाचे आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.‘जय महाराष्ट्र‘ कार्यक्रमातून ही विशेष मुलाखत मंगळवार, १४ जुलै २०२६ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित झाली असून महासंचालनालयाच्या अधिकृत समाजमाध्यमांवर देखील ही मुलाखत पाहता येणार आहे.

# दापचरी येथे ५५८ हेक्टरवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारणार

## पणन मंत्री जयकुमार रावल : वाढवण बंदराजवळ उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पामुळे राज्यातील शेतमाल निर्यातीला मोठी चालना मिळणार

■ मुंबई (दै. संध्या)

पालघर जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यातील दापचरी येथे 558.43 हेक्टर (1,395 एकर) क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्यात येणार असून, हा प्रकल्प महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी थेट जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम ठरेल, असा विश्वास पणन मंत्री जयकुमार रावल यांनी व्यक्त केला.

पणन मंत्री रावल यांनी मंत्रालयात पत्रकारांशी संवाद साधताना दापचरी येथे उभारण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराबाबत सविस्तर माहिती दिली. यावेळी पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते. मंत्री रावल म्हणाले, वाढवण बंदरापासून अवघ्या 40 किलोमीटर अंतरावर उभारण्यात येणारा हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांच्या गरजा पूर्ण करणारे जागतिक



दर्जाचे कृषी व्यापार केंद्र म्हणून त्याची उभारणी केली जाईल.

राज्यात आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशी त्रिस्तरीय विपणन व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून कृषी मालाच्या मूल्यसाखळीला बळकटी मिळणार आहे. निर्यात बाजार सुविधांचे एकत्रीकरण, काढणीनंतरचे मूल्यवर्धन, संगणकीकृत व पारदर्शक व्यवहार आणि आधुनिक बाजार पायाभूत सुविधा यावर विशेष भर दिला जाणार असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

दापचरी येथील केंद्रामध्ये घाऊक व्यापार, आयात-निर्यात सुविधा, शीतसाखळी व्यवस्था, ग्रेडिंग व पॅकेजिंग, मल्टिमोडल लॉजिस्टिक व्यवस्था तसेच अ‍ॅग्रीटेक व एक्स्चेंज सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. याशिवाय वेअरहाऊसिंग, कोल्ड स्टोरेज, रिपनिंग चेंबर्स, गुणवत्ता परीक्षण सुविधा, कंटेनर टर्मिनल, रेल्वे सायडिंग, ई-लिलाव व्यवस्था आणि निर्यात सुलभता केंद्र उभारण्याचे नियोजन आहे.

महाराष्ट्र द्राक्ष, डाळिंब, कापूस आणि कडधान्य उत्पादनात देशात प्रथम क्रमांकावर असून फळे व भाजीपाला उत्पादनात दुसऱ्या क्रमांकावर आहे. देशाच्या एकूण कृषी निर्यातीपैकी सुमारे 15 टक्के निर्यात महाराष्ट्रातून होत असून, भारतातील 43 टक्के फळ निर्यातही राज्यातून केली जाते. दापचरी प्रकल्पामुळे या निर्यात क्षमतेत आणखी वाढ होण्याची अपेक्षा पणन मंत्र्यांनी व्यक्त केली.

या प्रकल्पामुळे काढणीनंतर होणाऱ्या नुकसानीत 15 ते 20 टक्क्यांनी घट होण्यास मदत होणार असून, शेतमाल वाहतूक व हाताळणी खर्चातही 15 ते 20 टक्क्यांची बचत अपेक्षित आहे. प्रकल्पामुळे 10 हजारांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होणार असून, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसह कृषी प्रक्रिया उद्योग आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी गती मिळणार असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले.

वाढवण डीपवॉटर पोर्ट, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जवाहरलाल नेहरू बंदर, समृद्धी महामार्ग, वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर आणि वडोदरा एक्सप्रेस वे यांसारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांशी जोडणीमुळे निर्यात सुलभ होऊन लॉजिस्टिक खर्चात बचत होणार आहे. फळे, भाजीपाला, फुले, धान्य, कडधान्ये, मसाले आणि प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांच्या निर्यातीला या प्रकल्पातून मोठी चालना मिळेल.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुढाकाराने आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शनाखाली विकसित होणारा हा प्रकल्प महाराष्ट्राला देशातील अग्रगण्य कृषी निर्यात केंद्र बनविण्याच्या दिशेने महत्त्वाचा टप्पा ठरेल, असे सांगून दापचरी येथील आंतरराष्ट्रीय कृषी बाजार हा केवळ बाजार नसून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडणारा विकासाचा नवा मार्ग असल्याचे पणन मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी नमूद केले.

# एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्या विहार येथील विभागीय कार्यालयातून राज्यव्यापी वृक्षारोपण अभियानाचा शुभारंभ परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आमदार दिलीप लांडे, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांच्यासह महामंडळाचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. या अभियानाच्या माध्यमातून राज्यभरातील एसटीची बसस्थानके, आगारे, कार्यालये आणि विविध परिसरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यात आले.



परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, आजचा कार्यक्रम हा केवळ वृक्षारोपणापुरता मर्यादित नसून भावी पिढ्यांसाठी हिरवा, समृद्ध आणि सुरक्षित महाराष्ट्र घडविण्याचा सामूहिक संकल्प आहे. वाढते जागतिक तापमान, अनियमित पर्जन्यमान, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर आणि उष्णतेच्या लाटांसारख्या पर्यावरणीय संकटांचा सामना करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले. झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे असून ती प्राणवायू पुरवतात, कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात, तापमान नियंत्रित ठेवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे एक झाड लावणे म्हणजे भविष्यातील अनेक संकटांवर उपाय उभा करणे होय, असेही त्यांनी सांगितले.

एसटी महामंडळ हे केवळ प्रवाशांना सेवा देणारे परिवहन माध्यम नसून समाजाशी नाळ जोडलेली सामाजिक संस्था आहे. त्यामुळे समाजहिताचे आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबविणे ही देखील एसटीची सामाजिक बांधिलकी असल्याचे मंत्री सरनाईक यांनी नमूद केले.

# एमएमआर भागात पिंक ई-रिक्षांसाठी मार्ग निश्चित करून इलेक्ट्रिक वाहनांना चालना द्या – परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

■ मुंबई (दै. संध्या)

मुंबई महानगर प्रदेश परिसरात महिला ई-रिक्षा योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही अशा विशिष्ट मार्गांचे निश्चितीकरण करण्यात यावे, जेणेकरून इलेक्ट्रिक वाहनांना चालना मिळेल. तसेच ई-रिक्षांचा वेग आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी बॅटरी तंत्रज्ञानातील सुधारणा आणि पर्यायांबाबत संबंधित कंपन्यांसोबत तातडीने चर्चा करण्यात यावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीत मंत्रालयात महिला ई-रिक्षा योजनेच्या अंमलबजावणीबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, महिला व बालविकास विभाग, प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी उपस्थित होते. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, कमी वेगाच्या ई-रिक्षा मुख्य रस्ते किंवा महामार्गांवर चालविण्याऐवजी अंतर्गत मार्गांवर चालविल्यास वाहतुकीवर परिणाम होणार नाही. यासाठी वाहतूक



पोलीस आणि परिवहन विभागाने संयुक्तपणे योग्य मार्ग निश्चित करावेत. ई-रिक्षांमध्ये उपलब्ध जीपीएसप्रणालीचा वापर करून त्यांचे नियंत्रण व निरीक्षणही प्रभावीपणे करता येईल, असे त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर, ई-रिक्षांच्या वेग आणि क्षमतेसंदर्भातील अडचणी दूर करण्यासाठी परिवहन विभाग, वाहतूक पोलीस आणि संबंधित उत्पादक कंपन्यांची संयुक्त बैठक घेऊन बॅटरी तंत्रज्ञानातील सुधारणा आणि आवश्यक तांत्रिक बदलांवर चर्चा करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

महिला व बाल विकास मंत्री तटकरे म्हणाल्या की, महिला ई-रिक्षा योजनेअंतर्गत शासनाचे योगदान 20 टक्क्यांवरून 40 टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे. या योजनेत आता 50 टक्के कर्ज आणि 10 टक्के लाभार्थी हिस्सा राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच एमएमआर परिसरात सध्या लागू असलेल्या तांत्रिक निकषांमुळे एल-3 प्रवर्गातील ई-रिक्षा सुरू करता आलेल्या नाहीत. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘लास्ट माईल कनेक्टिव्हिटी’ लक्षात घेऊन निवडक मार्गांवर ही योजना सुरू करण्याबाबत सूचना दिल्याचेही त्यांनी सांगितले.

# पावसाळ्यात भटकंतीसाठी महाराष्ट्रातील ६ सर्वोत्तम ठिकाणे

■ मुंबई (दै. संध्या)

करड्या रंगाचे ढग दाटून येताच तहानलेली जमिन पावसांच्या सरीने अगदी ओलिचिंब होऊन जाते. निसर्ग धो-धो पाऊस अंगावर झेलत असताना पर्यटकांना भटकंतीचे वेड लागते. मग अशावेळी निसर्गाच्या सानिध्यात चार सुखाचे क्षण अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात सहा सर्वोत्तम ठिकाणे आहेत. जून महिन्यात पावसाची चाहुल लागताच सह्याद्रीच्या पर्वतरांगा, दाटून येणारे ढग, घनदाट जंगल पर्यटकांना आकर्षित करतात. तुडुंब भरुन वाहणाऱ्या नद्या, डोंगरमाथ्यावरुन वाहणारे धबधबे, घनदाट जंगलांमध्ये पसरलेली हिरवळ चादर आणि निसर्गाची किमया डोळ्यांना थक्क करते.

१) जव्हार : पालघर जिल्ह्यात वसलेले जव्हार हे ठिकाण महाराष्ट्रातील ‘दार्जिलिंग’ म्हणून ओळखले जाते. बहुदा या ठिकाणाबाबत फार कमी पर्यटकांना माहिती आहे. घनदाट जंगलाने वेढलेल्या या परिसराला ऐतिहासिक महत्त्व आहे. शिवाय जव्हारला आदिवासी सांस्कृतिक वारसाही लाभला आहे. या परिसरातील शांतता पर्यटकांच्या मनाला स्पर्श करुन जाते. येथील ५०० फुटांपेक्षा अधिक उंचीवरुन कोसळणारा दाभोसा धबधबा राज्यातील उंच धबधब्यांपैकी एक आहे. हाच धबधबा जव्हारचे मुख्य आकर्षण आहे. पावसाची चाहुल लागताच शांतता आणि नैसर्गिक सानिध्यात राहण्याच्या उद्देशाने पर्यटक या ठिकाणी गर्दी करतात. मुख्य वैशिष्ट्य म्हणजे या भागातील डोंगररांगांमध्ये वारली समुदाय पिढ्यानपिढ्या वास्तव्यास आहे. गावातील घरांच्या मातीच्या भिंतींवर पांढऱ्या रंगाने रेखाटलेली भौमितिक वारली चित्रकला त्यांच्या समृद्ध कलाकुसरीची साक्ष देतात.

२)चिखलदरा : सातपुडा पर्वतरांगांमध्ये बहरलेले चिखलदरा महाराष्ट्रातील एकमेव कॉफीचे उत्पादन घेणारे थंड हवेचे ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून १,११८ मीटर उंचीवर वसलेला हा भाग म्हणजे पर्यटकांसाठी पर्वणीच. हे ठिकाण पश्चिम घाटाच्या मुख्य गर्दीपासून दूर असल्यामुळे येथील शांत आणि निवांत वातावरण मनाला


जिथे ढग डोंगररांगांच्या कुशीत विसावतात...



एक वेगळीच अनुभूती देऊन जाते. जून महिन्यात निसर्गाने साद घालताच कॉफीच्या बागांनी नटलेला हा परिसर अधिकच नयनरम्य आणि विलोभनीय दिसतो. चिखलदरा जवळच असलेला मेळघाट व्याघ्रप्रकल्प सकाळच्या डोंगर-दऱ्यांच्या दाट धुक्यांमध्ये हरवून जातो. हे निसर्गाचे एक अनोखे रुप पाहणे म्हणजे स्वर्गसुखच आहे. तसेच घनदाट जंगलामधून झेपावणाऱ्या भीमकुंड धबधब्याचे रुप अनुभवण्यासारखे आहे. प्रचंड वेगाने कोसळणाऱ्या या धबधब्याच्या सानिध्यात असताना प्रत्येकाच्या ओठांवरील शब्दच हरवून जातात.

३)माथेरान : वाहनांच्या गजबजाटापासून दूर असलेले भारतातील एकमेव थंड हवेचे ठिकाण म्हणजे माथेरान. जून महिन्यात या ठिकाणाचे सौंदर्य अधिकच बहरते. दाट धुक्याची चादर पसरलेल्या घनदाट जंगलामधून मार्ग काढत टॉय ट्रेन जेव्हा धावते तेव्हा निसर्गाचे मनमोहक रुप अनुभवायला मिळते. लाल मातीचे रस्ते निवांत शांततेत विसावलेले बघताना मन बहरुन जाते. इको पॉईंट, पॅनोरमा पॉईंट आणि मंकी पॉईंट यांसारखी प्रसिद्ध प्रेक्षणीय ठिकाणे धुक्यामध्ये हरवून जातात. पण मजेशीर गोष्ट म्हणजे, निसर्गाचा हाच लपंडाव मनाला सर्वाधिक भुरळ पाडतो. डोळ्यांना दरीचे विस्तीर्ण रूप गवसण्यापूर्वीच तिचा आवाज आपल्या कानावर पडतो. पावसाळ्याच्या संथ लयीत हरवलेल्या या ठिकाणाकडे मन भरुन बघत असताना निसर्गाप्रती एक कृतज्ञतेची भावना दाटून येते.

४)कोयनानगर : निवांत पर्यटन (Slow Tourism) या आधुनिक संकल्पनेचा पर्यटकांना परिचय होण्यापूर्वीच कोयना नगरमध्ये संथ आणि निवांत क्षण अनेक वर्षांपासून प्रत्यक्षात अनुभवता येत आहेत. कोयना धरणाच्या आधारे निर्माण झालेल्या विस्तीर्ण शिवसागर तलावाच्या शेजारी वसलेले सातारा जिल्ह्यातील हे ठिकाण पर्यावरण-संवेदनशील क्षेत्रात येते. हेच लक्षात घेऊन येथे जाणीवपूर्वक आणि गरजेनुसारच विकास मर्यादित ठेवण्यात आला आहे. जूनमध्ये पावसाचा जोर वाढत असताना येथील वनराईला नवा बहर येतो.

सदर विभाग महाराष्ट्रातील अद्वितीय कला प्रकार, परंपरा आणि ऐतिहासिक स्थळे जपण्यासाठी, त्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी कार्य करतो. तसेच, सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवून, पर्यटन विकासाला चालना देऊन हा विभाग राज्याच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीमध्ये महत्त्वाचे योगदान देत आहे. सदर विभागाच्या प्रयत्नांमुळे महाराष्ट्र राज्य केवळ एक पर्यटन स्थळ म्हणूनच नव्हे, तर एक जिवंत संस्कृती आणि वारसा असलेले राज्य म्हणून अधिक समृद्ध आणि आकर्षक बनत आहे.

दिवसागणिक जंगल अधिकच घनदाट रूप धारण करते. वासोटा किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी शिवसागर तलावामधून बोटीने प्रवास करण्याचा अनुभव म्हणजे निसर्गाचे एक अनोखे वरदान आहे. या प्रवासादरम्यान किल्ल्यापर्यंत पोहोचण्याची उत्सुकता आणखीनच वाढते.

५) माळशेज घाट : महाराष्ट्रातील पावसाळा अनुभवण्यासाठी कोकण रेल्वेचा प्रवास जितका सुंदर वाटतो, तितकाच माळशेज घाटही मनाला भुरळ पाडतो. या दिवसांमध्ये माळशेज घाटात जाणे म्हणजे निसर्गाच्या पानावर उमटलेली एक कविता अनुभवण्यासारखे आहे. डोंगर-दऱ्यांमधून कोसळणारे धबधबे घाटात पांढऱ्याशुभ्र चादरीसारखे भासतात. तसेच या ठिकाणाजवळच असलेल्या पिंपळगाव जोगा धरणाच्या जलाशयामध्ये कधीकधी फ्लेमिंगो पक्ष्यांचे दर्शनही घडते. चहूबाजूंनी दाट धुक्यामध्ये हरवलेल्या माळशेज घाटाचे रूप न्याहाळताना मन प्रसन्न होते. जवळच असलेला हरिश्चंद्रगड अनुभवी गिर्यारोहकांना साद घालतो. तसेच फक्त पावसात उभे राहून जगण्याचा निखळ आनंद घेऊ इच्छिणाऱ्यांना हा घाट आपलेसे करतो.

६)आंबोली : महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीच्या दक्षिण टोकाला वसलेले आंबोली हे खूप सुंदर पण अजूनही पर्यटकांच्या नजरेआड असलेले थंड हवेचे ठिकाण आहे. आजच्या सोशल मीडियाच्या काळातही येथील धबधबे आणि प्रेक्षणीय ठिकाणे एका नवीन प्रवासाचा अनुभव देतात. आंबोली घाटात सह्याद्रीतील सर्वात जास्त पाऊस पडतो. येथील जंगलात अतिशय दुर्मिळ असा 'आंबोली बुश फ्रॉग' हा बेडूक आढळतो. निसर्गप्रेमी आणि वन्यजीव संशोधकांसाठी हे ठिकाण खऱ्या अर्थाने मुख्य आकर्षणाचे केंद्र आहे. जून महिन्याच्या सुरुवातीलाच संपूर्ण परिसरात पसरलेली दाट धुक्यांची चादर, छोटे-मोठे धबधबे आणि बेडकांचे एकाच सुरात ओरडणे पर्यटकांना एका वेगळ्याच दुनियेत घेऊन जाते. आंबोली म्हणजे महाराष्ट्रातील पावसाळ्याचे सर्वात सुंदर आणि देखणे रुप आहे.

पावसाळ्याच्या दिवसांमध्ये महाराष्ट्रभर भटकंती करत असताना अनेक गोष्टी साद घालतात. धो-धो पावसात भिजण्याची, प्रवासातील विलंबाचा आनंद लुटण्याची, नव्या वाटांवरुन प्रवास करण्याची, कधीतरी एखाद्या ढाब्यावर थांबून चहा पिण्याची, कुठेही पोहोचण्याची घाई नसताना वेळेचे भान विसरुन विसावण्याची तुमची तयारी असायला हवी. शेवटी हाच प्रवासाचा सर्वात सुंदर अनुभव आहे, हेच खरे.

महाराष्ट्र पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाची ३१ मे २०१६ रोजी स्थापना झाली. राज्याचा समृद्ध सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी आणि पर्यटन क्षेत्र अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने या विभागाची स्थापना करण्यात आली. पर्यटन आणि संस्कृती यांची नाळ एकमेकांशी घट्ट जोडलेली आहे. कारण ऐतिहासिक स्मारके, लोककला आणि स्थानिक परंपरा या केवळ सांस्कृतिक ठेवा नसून पर्यटन आकर्षण म्हणूनही ओळखल्या जातात. हेच लक्षात घेऊन महाराष्ट्र सरकारने धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी आणि या क्षेत्रांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी स्वतंत्र मंत्रिमंडळ स्तरावरील विभाग स्थापन केला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन श्वेतांबर मंदिरात यशोविजयसुरीजी महाराज यांचे प्रवचन

पुणे (दैनिक संध्या) : चातुर्मास प्रवेशानिमित्त श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन श्वेतांबर मंदिर मध्ये आचार्य श्री यशोविजयसुरीजी महाराज ह्यांच्या उपस्थित साध्वीजी श्री शाशवतरती म.सा आदि ठाणा ५ ह्यांचा चातुर्मास प्रवेश उत्साही वातावरणात संपन्न झाला. आचार्य श्री यशोविजयसुरिजी महाराज यांची रामोशी गेट येथून भवानी पेठ जैन मंदिरापर्यंत पालखीमध्ये भव्य मिरवणूक करण्यात आली यावेळी चातुर्मास प्रवेशानिमित्त संपूर्ण मंदिरात फुलांनी सजविले होते प्रवेशद्वारावर रांगोळी काढून त्यांचे स्वागत करण्यात आले तसेच मंदिरात भक्तीमय वातावरणात आचार्य श्री यशोविजयसुरिजी महाराज यांचे प्रवचन झाले. यावेळी श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन श्वेतांबर मंदिराचे अध्यक्ष रतन मेडतीया, सेक्रेटरी नरेंद्र जैन, सदस्य कीर्तीकुमार ओसवाल, प्रकाश शहा, विलास ओसवाल, हस्तीमल मुथ्था, साकलचंद कटारिया, विनोद जैन, धनराज जैन, धनराज निबजीया, मनोज शहा आदी उपस्थित होते.



### महात्मा गांधी विद्यालयात ‘ज्ञानाची वारी’; ग्रंथदिंडीतून सामाजिक संदेश

नीरा (दैनिक संध्या) : संत सोपानकाका महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या आगमनानिमित्त नीरा येथील महात्मा गांधी विद्यालयात मंगळवारी ‘ज्ञानाची वारी’ या उपक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले. ग्रंथदिंडी, भारूड आणि प्रभात फेरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी भक्तीबरोबरच साक्षरता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. विद्यालयातील सर्व विद्यार्थी वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झाले होते. इयत्ता पाचवीतील शिवराज गायकवाड याने विठ्ठलाची, तर गणराज गायकवाड याने संत ज्ञानेश्वर माऊलींची वेशभूषा साकारली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेले ‘ज्ञानाची वारी’ या विषयावरील भारूड आणि प्रियांशु टकले याची पाखवाजाची साथ विशेष आकर्षण ठरली. टाळ-मृदुंगाच्या गजरात काढण्यात आलेल्या प्रभात फेरीत ‘सक्षम भारत, साक्षर भारत’, ‘पाणी वाचेल, निसर्ग हसेल’, ‘नका तोडू वृक्ष’ अशा घोषणांद्वारे विद्यार्थ्यांनी सामाजिक संदेश दिला. नीराचे उपसरपंच राजेश काकडे आणि स्कूल कमिटी सदस्य अनिल अण्णा चव्हाण यांच्या हस्ते शिवाजी चौकात पालखीला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. या कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य अनिल धुमाळ, पर्यवेक्षक किशोर जगताप, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.



### नळवणे येथे पशुपालन व कृषी उद्योग प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील नळवणे येथे स्थानिक व पठार भागातील शेतकऱ्यांसाठी पशुपालन आणि कृषी उद्योग प्रशिक्षण कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या भागात पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर अशा प्रकारच्या व्यापक प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती सरपंच अर्चना उबाळे यांनी दिली. या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक जयंत वसंत कांबळे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना पशुपालन व्यवसायातील विविध महत्त्वपूर्ण पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. यामध्ये प्रामुख्याने आधुनिक गोठा बांधणी, पशुधन व्यवस्थापन, पशुंचे लसीकरण, त्यांचे आरोग्य व औषधोपचार, चारा नियोजन तसेच आधुनिक संगोपन पद्धती याविषयी उदाहरणांसह सखोल माहिती देण्यात आली. याप्रसंगी नळवणे गावचे ग्रामविकास अधिकारी दीपक साबळे यांच्यासह बेल्हे, राजुरी आणि परिसरातील गावांतून आलेले बहुसंख्य शेतकरी व पशुपालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सासवड एस. टी. स्थानक परिसर सुशोभित करणार : वृषाली तांबे

**सासवड (दै. संध्या)**



आगाराच्या परिसरात वृक्ष लागवडीला सुरूवात

सासवड शहराचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एस टी स्थानकाचे सुशोभित करण्यात येणार असल्याचे आगार प्रमुख वृषाली तांबे यांनी सांगितले. राज्य परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने राज्यातील सर्व आगारात मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून पर्यावरण संतुलन राखण्याचा निर्णय घेण्यात आला होता त्याचा शुभारंभ आज सासवड आगारात वृक्षारोपण करून करण्यात आला त्या प्रसंगी तांबे यांनी ही माहिती दिली.स्थानक प्रमुख मोहिनी ढेरे, स्व. एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, सेवानिवृत्त सांख्यिकीय अधिकारी सुरेश लोणकर आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. येत्या काही दिवसात एस टी स्थानक परिसरात आंबा फणस व अन्य काही जंगली वृक्षाची लागवड करण्यात येणार असल्याचेही वृषाली तांबे यांनी सांगितले. स्थानक परिसरातील अवैध वाहतूक तसेच बेकायदेशीर होर्डिंग्ज यावर देखील सासवड पोलीस व नगर पालिका यांच्या सहकार्याने निर्बंध घातले जातील असेही तांबे यांनी स्पष्ट केले. सासवड एस टी स्थानका व्यतिरिक्त जवळच्या काही बस थांब्यावर देखील संबंधीत परवानग्या घेऊन वृक्ष लागवड केली जाईल असे मोहिनी ढेरे यांनी सांगितले.

कार्यक्रमास एस टी कर्मचारी संघटनेचे सुरेश कद्दू, संतोष भोंगळे, वाहतूक नियंत्रक महेश भोंगळे, प्रवीण गायकवाड पोपट जैनक,रामदास गावडे, कैलास जगताप यांसह अमित वाल्मिकी, लक्ष्मी गायकवाड, गणेश कामठे, वाजीद तांबोळी, सासवड पथारी संघटनेचे संचालक गुलाब सोनवणे, शहर पत्रकार संघाचे हेमंत ताकवले, महादेव खेंगरे, महादेव शिवरकर, वाहक, चालक व कार्यशाळा कर्मचारी, महिला सफाई कर्मचारी छाया पवार या प्रसंगी उपस्थित होते.

## पुण्यातील पाणीकपात निर्णय मागे; ५८ टक्के साठा, २२ जुलैनंतर नव्याने आढावा

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहरात उद्यापासून (ता. १५) पाणीकपात होणार अशी घोषणा आयुक्त नवल किशोर राम यांनी केली होती. मात्र, त्यानंतर २४ तासांच्या आत महापौर मंजूषा नागपुरे यांनी हा निर्णय मागे घेतला आहे. खडकवासला धरणाच्या कॅनॉलमधून पाणी सोडले जात आहे. अशा वेळी पुणेकरांवर पाणीकपात करणे योग्य नाही, असे सांगून बुधवारपासून होणारी पाणीकपात रद्द केली आहे. या निर्णय प्रक्रियेत प्रशासन व सत्ताधारी यांच्यातील गोंधळ समोर आला असला तरी या निर्णयाने पुणेकरांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, २२ जुलैनंतर पावसाचा व धरणातील पाणीसाठ्याचा विचार करून पुढील निर्णय घेतला जाणार आहे.

पावसाने ओढ दिल्याने पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण प्रकल्पाने तळ गाठल्याने महापालिकेने १५ जूनपासून शहरात एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला होता. पण शहरात संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज यांच्या पालखीचे आगमन झाल्याने पाणीकपात १२ जुलैपर्यंत मागे घेतली होती. दरम्यान गेल्या आठवड्यात धरणाच्या पानलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस झाल्याने धरणातील पाणीसाठा १२ टक्क्यांवरून ५८ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. ही पुणेकरांसाठी दिलासादायक बाब आहे. पण पुढील काळात पाऊस किती पडेल, धरणात किती पाणी जमा होईल याचा अंदाज घेणे आवश्यक आहे. अजूनही धरणे १०० टक्के भरलेली नाहीत. त्यामुळे बुधवारपासून (ता. १५) पाणीकपात सुरू केली जाईल, असे आयुक्त राम यांनी स्पष्ट केले होते.

आयुक्त राम यांच्या निर्णयामुळे प्रशासनातील अधिकारी, महापालिकेतील पदाधिकारी यांच्यात अस्वस्थता निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर महापौर मंजूषा

## वारूळवाडी शिवारात बिबट्या व दोन पिलांचे दर्शन

**नारायणगाव (दै. संध्या)**

वारूळवाडी गावचे माजी सरपंच श्री. राजेंद्र तुकाराम मेहेर यांच्या डिंबा डावा कालवा या दक्षिणेच्या बाजूस असणाऱ्या उसाच्या शेतामध्ये दोन बिबट्याचे बछडे सकाळी शेजारच्या असणाऱ्या रिकाम्या शेतामध्ये खेळताना त्यांना दिसून आले आहे. त्या ठिकाणी बिबट्याची मादी व नर असावा असा प्राथमिक अंदाज त्यांनी त्या ठिकाणी व्यक्त केला आहे. तेथील ग्रामस्थांनमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मेहेर यांनी ही माहिती वारुळवाडी गावचे पोलीस पाटील तथा आपदा मित्र सुशांत भुजबळ यांना दिली. जुन्नर वनपरिक्षेत्राधिकारी श्री. प्रदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल गौरी हिंगणे ,वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांनी श्री. मेहेर यांना फोन द्वारे माहिती दिली व त्या ठिकाणी जाताना येताना व त्या ठिकाणच्या राहणाऱ्या नागरिकांना योग्य ती काळजी घेण्यास सांगितली. बछडे लहान असल्याने मादी त्या ठिकाणी जास्त दिवस न राहता दुसऱ्या उसात स्थलांतर करीन असा अंदाज जुन्नर वन विभाग यांनी केला आहे व लवकरच त्या ठिकाणी बिबट्याला जेरबंद करण्याकरता पिंजरा लावला जाईल अशी माहिती वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांनी दिली.

## वाल्मिकींच्या तपोभूमीत माऊलींचा मुक्काम

**वाल्हे (दै. संध्या)**



पंढरीचा महिमा !
देतां आणिक उपमा !!
ऐसा ठाव नाही कोठे!
देव उभा उभी भेटे !!

या उक्तीची प्रचीती देणारा वैष्णवांचा महासागर टाळ मृदुंगाच्या गजरात व ज्ञानोबा माउलींच्या जयघोषात आद्यकवी रामायणकार महर्षी वाल्मिकी ऋषींची तपोभूमी असलेल्या पुरंदर तालुक्यातील वाल्हे नगरीत आज दुपारी सव्वा बाराच्या सुमारास मुक्कामी दाखल झाला.यावेळी पंढरीच्या वाटेवर चालणाऱ्या लाखो पावलांना या ठिकाणी विसावा मिळणार असल्याने वाल्हेकर ग्रामस्थांनी गावच्या सरहद्दीवरच फुलांची मुक्त उधळण करून माउलींच्या पालखी सोहळ्याचे जल्लोषात स्वागत केले.

महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या जेजुरीच्या खंडोबाचा निरोप घेऊनच माउलींचा आजचा प्रवास येथील ऐतिहासिक अहिल्याबाई होळकर तलावाच्या काठी असलेल्या नवीन पालखी तळावरून सकाळी पावणे सातच्या सुमारास सुरु झाला. जेजूरी ते वाल्हे हा साधारण ११ कि.मी.चा टप्पा असल्याने विठ्ठल भक्तांनी ऊन सावलीचा आनंद घेत अभंग व हरिनामाचा जयघोष करत उत्साही वातावरणात मार्गक्रमणास सुरवात केली .यावेळी पालखी मार्गावरून प्रवास करत वैष्णवांचा महासागर तरसदरा खिंडीत न्याहारी साठी थांबला . या दरम्यान परिसरातील माऊली भक्तांसह सामाजिक मंडळांकडून वारकऱ्यांना पिठलं भाकर देण्यात आल्याने न्याहारीवर ताव मारून वारकरी संप्रदाय अक्षरशः तृप्त झाला होता.

पुणे जिल्ह्यात पालखी सोहळ्याचा शेवटचा मुक्काम वाल्हे नगरीतच असल्याने वाल्हे गावच्या सरहद्दीवर दुपारी सव्वा बाराच्या सुमारास माउलींच्या पालखीचे आगमन झाले .यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष प्रा.दिगंबर दुर्गाडे वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ पोलीस निरीक्षक केशव जगताप भाजप ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सचिन लंबाते माजी पोलीस पाटील प्रवीण कुमठेकर माथाडी कामगार संघटनेचे नीलेश पवार तसेच तुषार भुजबळ अमित पवार यांसह विविध गावचे सरपंच उपसरपंच तसेच शासकीय प्रशासकीय पदाधिकारी व वाल्हेकर ग्रामस्थांकडून पालखी सोहळ्याचे स्वागत मोठ्या जल्लोषात करण्यात आले.

## नीरा नगरीत संत सोपानकाकांच्या पालखी सोहळ्याचे उत्साहात स्वागत

आज सोमेश्वरनगर येथे होणार वारीतील पहिले गोल रिंगण

**नीरा (दै. संध्या)**



संत सोपानकाका महाराजांचा पालखी सोहळा मंगळवारी पुरंदर तालुक्यातील शेवटचा मुक्काम मांडकी येथे पूर्ण करून जेऊर, पिंपरे (खुर्द) मार्गे नीरा नगरीत भक्तिमय वातावरणात दाखल झाला. अहिल्यादेवी होळकर चौकात पालखी रथातून पादुका खांद्यावर घेत विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात नेण्यात आल्या. "माऊली... माऊली..."च्या अखंड गजरात आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात ग्रामस्थांनी पालखीचे उत्स्फूर्त स्वागत केले. मंगळवारी सकाळी बागायती गाव म्हणून परिचित असलेल्या मांडकी येथील मुक्काम आटोपून पालखी सोहळा जेऊरमार्गे पुढे मार्गस्थ झाला. सकाळी सातच्या सुमारास जेऊर येथे ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत केले. त्यानंतर पिंपरे (खुर्द) परिसरातून मार्गक्रमण करत असताना उन्हाची तीव्रता वाढली होती. तरीही हरिनामाच्या गजरात वारकरी पायी चालत नीरेकडे मार्गस्थ झाले. साडेअकराच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयासमोरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात पालखी रथाचे आगमन झाले. प्रदीर्घ पायी प्रवासामुळे वारकरी काहीसे शिणलेले दिसत असले, तरी त्यांच्या चेहऱ्यावरचा भक्तिभाव आणि विठ्ठलनामाचा उत्साह कायम होता.

यावेळी स्वागतासाठी पुरंदर पंचायत समितीच्या सदस्या मोनिका कांबळे, नीरेचे उपसरपंच राजेश काकडे, जिल्हा नियोजन समितीचे माजी सदस्य विराज काकडे, माजी सभापती दत्ताजीराव चव्हाण, नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विक्रम दगडे, ग्रामपंचायत सदस्य अभिषेक भालेराव, अनंता शिंदे, सुनील चव्हाण, अनिल चव्हाण, डॉ. वसंत दगडे, कांचन निगडे, विजय शिंदे, राजेश चव्हाण, स्वप्निल कांबळे, कल्याण जेधे, टी. के. जगताप, बाळासाहेब ननावरे, ॲड. आदेश गिरमे, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, मंगेश ढमाळ, बाळासाहेब मोरे, ग्रामसेवक रमेश राऊत, तलाठी मयूर पाटोळे, अप्पा लकडे यांच्यासह भाविक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अहिल्यादेवी होळकर चौकात पालखी रथातून उतरविल्यानंतर उत्साही भाविकांनी पालखी खांद्यावर घेतली. "माऊली... माऊली..."च्या जयघोषात टाळ-मृदुंगाच्या तालावर पालखी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात नेण्यात आली. दुपारच्या विसाव्यादरम्यान परिसरातील नागरिकांनी रांगा लावून संत सोपानकाका महाराजांच्या पादुकांचे भावपूर्ण दर्शन घेतले.संत सोपानकाका महाराजांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या दिंड्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. यंदा सोहळ्यात ११ नवीन दिंड्यांची भर पडली असून, एकूण १२६ दिंड्या सहभागी झाल्या आहेत. त्यापैकी रथापुढे २७ तर रथामागे ९९ दिंड्या असून, सुमारे एक लाखांहून अधिक वारकरी पायी वारी करत असल्याची माहिती सोहळा प्रमुख ॲड. त्रिगुण गोसावी यांनी दिली.

पालखीच्या विसाव्यानंतर ग्रामपंचायतीच्या वतीने विठ्ठल मंदिर सभागृहात वारकऱ्यांसाठी अन्नदानाची व्यवस्था करण्यात आली. दुपारी तीन वाजता पालखी सोहळा बारामती तालुक्यातील निंबुत येथील मुक्कामासाठी प्रस्थान करणार असल्याचा पुकारा चोपदार मनोज रणवरे यांनी दिला.

### आज पहिले गोल रिंगण

संत सोपानकाका महाराजांच्या पालखी सोहळ्यातील यंदाचे पहिले गोल रिंगण बुधवारी बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील मु. सा. काकडे महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे. यंदा तिथीक्षय आल्यामुळे माळेगाव (ता. बारामती) येथे होणारा पारंपरिक रिंगण सोहळा रद्द करण्यात आल्याची माहिती सोहळा प्रमुख ॲड. त्रिगुण गोसावी यांनी दिली.

# ‘एआय'ला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन बनवा

विवेक सावंत यांचे प्रतिपादन; पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव उत्साहात

**पुणे (दै. संध्या)**




"आजचे जग कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) आहे. एआयला स्पर्धक नव्हे, तर विचारशक्ती वाढविणारे साधन म्हणून स्वीकारा. तंत्रज्ञान नोकऱ्या संपवत नाही, तर नव्या प्रकारच्या रोजगारसंधी निर्माण करते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःची आवड, क्षमता आणि करिअरच्या नव्या वाटांचा शोध घेत कौशल्याधारित शिक्षण आणि नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा," असे प्रतिपादन महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड (एमकेसीएल)चे संस्थापक-संचालक विवेक सावंत यांनी केले.

पुणे विद्यार्थी गृहाच्या विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सवी २५ व्या वर्धापनदिवस सोहळ्यात सावंत बोलत होते. कुलगुरू दादासाहेब केतकर सभागृहात आयोजित सोहळ्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर, पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे, उपकार्याध्यक्ष अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, खजिनदार कृष्णाजी कुलकर्णी, संस्थेचे संचालक सुनील रेडेकर, पौर्णिमा लिखिते, रमेश कुलकर्णी, राजेंद्र कडूसकर, महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, उपप्राचार्य प्रा. रेखा जोशी, प्रा. डॉ. स्वाती जोशी आदी उपस्थित होते.

विवेक सावंत म्हणाले, "मानवी बुद्धी ही 'यूज इट ऑर लूज इट' या तत्त्वावर कार्य करते. त्यामुळे साचेबंद विचारांमध्ये अडकून न राहता समस्या सोडविण्याची क्षमता, सर्जनशीलता आणि कौशल्ये विकसित करा. यंत्रांसारखे काम करू नका; एआयचा वापर स्वतःची विचारशक्ती अधिक सक्षम करण्यासाठी करा. शिक्षण आणि रोजगार क्षेत्रातील हा संक्रमणाचा काळ आहे. सामाजिक माध्यमांचा अनावश्यक वापर कमी करून मेहनत, संयम, टीम स्पिरिट आणि सॉफ्ट स्किल्स विकसित करा. कौशल्याधारित, उद्योगाभिमुख आणि तंत्रज्ञानस्नेही शिक्षणामुळे भविष्यातील रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होतील. समाजासाठी उपयुक्त आणि उत्पादक ज्ञान मिळविण्यावर भर द्या."

डॉ. पराग काळकर म्हणाले, "शैक्षणिक क्षेत्रात मोठे बदल होत असून पारंपरिक अभ्यासक्रमांबरोबरच तंत्रज्ञानयुक्त, कौशल्याधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षणाची गरज वाढली आहे. केवळ पदवी मिळवणे पुरेसे नसून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे ज्ञानाचे कृतीत रूपांतर करण्यावर भर दिला जात आहे. शिक्षणसंस्थांनी पदवी आणि उद्योगातील अनुभव यांचा प्रभावी मेळ घालून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला पाहिजे. नव्या व्यवस्थेच्या गरजा ओळखून सक्षम, कुशल आणि उद्योगस्नेही मनुष्यबळ तयार करणे ही काळाची गरज असून, शिक्षणसंस्थांनी त्यासाठी पुढाकार घ्यावा."

परशुराम वाडेकर म्हणाले, "परिस्थिती सुधारायची असेल, तर चांगले शिक्षण घेणे गरजेचे आहे. पुणे विद्यार्थी गृहाने गेल्या शंभर वर्षात लाखो गरीब व गरजू विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम केले आहे. संस्थेच्या कार्याला पूरक काम करीत विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयानेही रोजगारक्षम व उद्योगाभिमुख युवकांच्या पिढ्या घडवल्या आहेत. स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या महात्मा फुले यांच्या द्विशताब्दी सोहळा सर्वत्र उत्साहात साजरा व्हावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. जुन्याकाळी स्थापन झालेल्या या संस्थांनी कालानुरूप बदल स्वीकारले. मात्र, मूल्यांशी तडजोड न करता उत्तम नागरिक घडविण्याचे कार्य सुरु ठेवले आहे."

राजेंद्र बोऱ्हाडे म्हणाले, "विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने गेल्या २५ वर्षांत गुणवत्तापूर्ण शिक्षण, संस्कार आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. बदलत्या काळानुसार कौशल्याधारित, उद्योगाभिमुख आणि तंत्रज्ञानस्नेही शिक्षण देण्यावर संस्थेचा भर राहिला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेत शिक्षणाबरोबरच संशोधन, नवोपक्रम, उद्योजकता, क्रीडा, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांना सक्षम करण्याचे कार्य सुरु आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने भविष्यातील आव्हानांना समर्थपणे सामोरे जाणारे विद्यार्थी घडविण्यासाठी संस्था कटिबद्ध आहे."

प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे यांनी प्रास्ताविकात महाविद्यालयाच्या २५ वर्षांच्या जडणघडणीचा आढावा घेतला. यावेळी महाविद्यालयाच्या प्रगतीमध्ये योगदान देणाऱ्या पदाधिकारी, कर्मचारी व माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. रौप्यमहोत्सवी वाटचालीचा वेध घेणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन झाले. प्रा. तेजल चोथे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी आभार मानले.